

# मंथन

२०००


91·46
..n/2000

891.46
Mau/2K

5431

**मंथन** सन्मानचिन्ह
शांताराम पवार

संकल्पना
अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र,
करुणाकर



ग्रंथमोजणी
2001-2 : 6.3.2002
2002-3 : 20/3/2003
2003-४ : २५.३.४
२००४-५ : 20/3/5
२००५-६ : ११.२.६
२००७-८ : २०/२/८
२००८-९ : १४/१२/८
200९-10
2010-11 : १०-२-११
२०१२-१३
२०१४-१५
२०१५-१६
२०१६-१७


**मुखपृष्ठ**
शांताराम पवार

**मुखपृष्ठ संकल्पना**
सज्जनांचे निरपेक्ष जगणे, आयुष्यभर झिजणे

**आतील अक्षरे**
गुंजन मोहिते

**मांडणी**
भास्कर बोरकर

**छायाचित्रे**
विठोबा पांचाळ

**प्रकाशक**
माधव साठे
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य
गौरव पुरस्कार समिती
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५



# नि । वे । द । न

गेली सात वर्षे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'तर्फे 'मराठी साहित्य गौरव पुरस्कार' प्रदान केले जात आहेत. त्याचप्रमाणे १९९६ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'समाजकार्य गौरव पुरस्कारां'ची योजना कार्यान्वित केली आहे. परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचे मोहोळच महाराष्ट्रात काम करताना दिसते. अशा व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा, या हेतूने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही 'समाजकार्य गौरव पुरस्कारां'ची योजना १९९६ पासून सुरू केली. या योजनेची कार्यवाही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'कडे सोपविली आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या या योजनेमध्ये पुरस्कार देण्याकरिता समाजकार्याच्या तीन क्षेत्रांचा अंतर्भाव केला आहे. १) समाजप्रबोधन, २) स्त्रियांचे प्रश्न व ३) पर्यावरण–संतुलन/संरक्षण. या तीन क्षेत्रांपैकी एका क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्थेला तीन लाख रुपयांचा पुरस्कार व मानचिन्ह देऊन 'महाराष्ट्र फाउण्डेशन' गौरविते. तसेच, अन्य क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना व शिवाय वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा पुरस्कार व मानचिन्ह दिले जाते.

या योजनेची कार्यवाही करण्याकरिता 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने वरील क्षेत्रात काम करीत असलेल्या दहा जाणकार व्यक्तींची 'सल्लागार समिती' गठित केली. या समितीने संस्थेला द्यावयाच्या ३ लाख रुपयांच्या २००० सालच्या पुरस्कारासाठी 'स्त्रियांचे प्रश्न' हे क्षेत्र निश्चित केले. महाराष्ट्राच्या विविध भागातील पत्रकार, प्राध्यापक, कार्यकर्ते यांच्याकडून पुरस्कार कोणत्या संस्थेला/व्यक्तीला द्यावे, यासंबंधी अभिप्राय मागविण्यात आले. तसेच महाराष्ट्राच्या विविध भागात प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रातून या आशयाचे आवाहन करण्यात आले. असे अभिप्राय आल्यावर आवश्यक त्या बाबतीत अधिक माहिती मिळवून 'सल्लागार समिती'ने प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस केली. निवडीसाठी सहाय्यभूत होतील, अशा तऱ्हेच्या संस्था व व्यक्तींच्या कार्यासंबंधींची विस्तृत टिपणेही पाठविण्यात आली. सल्लागार समितीत मृणाल गोरे, पन्नालाल सुराणा, अर्जुन डांगळे, पुष्पा भावे, उल्हास राणे, नागेश हाटकर, सुरेश कराळे, आनंद करंदीकर, कुमार शिराळकर व चंद्रकांत केळकर यांचा अंतर्भाव आहे. सल्लागार समितीने शिफारस केलेल्या नावांमधून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या निवड समितीने अंतिम निर्णय घेतला.

या गौरव पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या.

१) ज्या सामाजिक संस्था व व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या सहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्ये रूजविण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहेत,

२) पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत,

३) ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य याविषयीच्या जाणीवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांनी ईर्षा जागृत होत आहे.

या प्रक्रियेत आम्हाला अनेकांचे अतिशय मोलाचे सहाय्य झाले आहे. या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**माधव साठे**

निमंत्रक

महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार समिती,

मुंबई.

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# समाजकार्य गौरव पुरस्कार
# प्रदान समारंभ

**२०००चे मानकरी**

**संस्था**
स्त्रियांचे प्रश्न
महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक

891.46
Man/2K

**व्यक्ती**
समाजप्रबोधन
मनोहर कदम, मुंबई

पर्यावरण - संतुलन / संरक्षण
वरुणराज भिडे स्मृत्यर्थ पुरस्कार
चिं. धों. आसवले
म्हातारबाची वाडी, जि. पुणे


**वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य**
संजय संगवई, पुणे

**अध्यक्ष**
प्रा. राम बापट

**प्रमुख पाहुणे**
अरुणा रॉय
किसान मजदूर संगठन, राजस्थान

**सूत्र संचालन**
पुष्पा भावे

**समारंभ**
शनिवार दिनांक ३० डिसेंबर २०००
सायंकाळी ५.३० वाजता
कर्नाटक संघ सभागृह
माटुंगा (प.रे.), मुंबई




# स्त्री-आरक्षण
## प्रश्नाचे राजकारण

■ भास्कर लक्ष्मण भोळे

स्त्रि यांना या देशात विधिमंडळांमध्ये आरक्षण असावे की असू नये, या प्रश्नाची राजकारणाने अशी विचित्र गत तूर्तास करून ठेवली आहे की विचारता सोय नाही. सर्व राजकीय पक्षांचे ज्यावर होकारार्थी उत्तर आहे असा हा एक अत्यंत दुर्मिळ प्रश्न आहे. पण तसे असूनही त्या पक्षांचे संसदेतील प्रतिनिधी संबंधित विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊ द्यायला मात्र तयार नाहीत, ही राजकारणाची अद्‌भुत किमया आहे.

स्त्रियांसाठी आरक्षण असू नये, हा मुद्दा तसा नवा नाही. किंबहुना अलीकडची दहापंधरा वर्षे वगळल्यास एकूण तशीच धारणा या देशात सार्वत्रिक होती. गांधीजी आणि आंबेडकर या दोहोंच्याही चळवळींमध्ये स्त्रियांचा लक्षणीय सहभाग झाला होता. तरी पण स्त्रीविशिष्ट मागण्यांवर आधारित खास स्त्रियांचा असा राजकीय गट स्वातंत्र्य चळवळीत कधीच निर्माण झाला नव्हता. जात किंवा धर्म या आधारांवर राजकीय विशेष सवलती व संरक्षण मागणारे प्रवाह पुढे आले त्या काळातही लिंगाधारित मागण्या मात्र कोणीच रेटल्या नव्हत्या. स्त्री-सुधारणेसाठी झटणाऱ्यांची स्वतंत्र परंपरा येथे उभी राहिलेली असूनही एक वेगळा अन्यायग्रस्त गट म्हणून तिनेही स्त्रियांच्या हक्कांचा पाठपुरावा त्या काळात केला नव्हता. पुढे डॉ. आंबेडकरांनी त्या हक्कांसाठी हिंदू कोड बिल मांडले तेव्हा त्याला झालेल्या विरोधाची ही पार्श्वभूमी होती.



पुढे ते विधेयक तुकड्यातुकड्यांनी मंजूर झाले. त्यातून स्त्रियांना काही हक्कही मिळाले. स्त्रीविषयक सुधारणांना कायद्याचे अधिष्ठान प्राप्त झाले. पण तरीसुद्धा स्त्रियांना नोकऱ्यांत किंवा जनप्रातिनिधिक संस्थांत राखीव जागा असाव्यात असे कोणाच्याही मनात आले नाही. एवढेच काय पण १९७४ साली स्त्रियांच्या दर्जासंबंधीच्या सरकारी समितीने आपल्या अहवालात स्त्रियांना विधिमंडळांत आरक्षण नकोच, असा बहुमताचा निर्णय अंतर्भूत केला होता. त्या मागची भूमिका अशी होती की सामाजिक सुधारणा, स्त्री-शिक्षण-प्रसार, लोकशाही प्रक्रियांचा प्रभाव इत्यादींमधून स्त्रियांचे समाजातील स्थान आपोआपच उंचावत जाईल, उलट मागास घटक म्हणून त्यांना वेगळी वागणूक दिल्यास कदाचित यात व्यत्यय येईल.

अर्थात तरीही स्त्रियांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याची जबाबदारी संविधानकारांनी सरकारवर सोपविलेलीच होती. स्त्री-पुरुषांच्या समान कामाला समान वेतन दिले जाईल, त्यांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाची संधी प्राप्त होईल, समान नागरी कायदा अंमलात येईल आणि स्त्रियांचे पोषण, आरोग्य व प्रसूतिकाळातील सोयी-सवलती यांकडे लक्ष पुरविले जाईल, या दृष्टीने सरकारने धोरणे आखावीत आणि कायदे करावेत, हे संविधानाच्या नीतिनिर्देशक तत्त्वांच्या भागात आवर्जून नमूद करण्यात आले होते. त्या अनुषंगाने हुंडाविरोधी कायद्यापासून अत्याचारविरोधी कायद्यापर्यंत अनेकानेक स्त्रीविषयक कायदे विविध सरकारांनी केले. स्त्रियांचे संरक्षण, आर्थिक प्रगती, शिक्षण, आरोग्य, रोजगार इत्यादींविषयी महाराष्ट्रासारख्या काही राज्यांनी विशेष धोरणेही घोषित केली व अंमलात आणली.

पण या सर्व उपक्रमांतून अपेक्षित फलश्रुती हाती आली नाही. स्त्रियांच्या चळवळींना थोडीफार चालना मिळाली किंवा स्त्री-शक्ती काही अंशी वाढली. पण सध्या चलनीमूल्य लाभलेली संज्ञा वापरून सांगायचे तर एक राजकीय घटक म्हणून स्त्रियांचे 'सबलीकरण' (एम्पॉवरमेन्ट) मात्र घडून आले नाही. जे काही सबलीकरण झाले ते फार तर विकासकार्यात त्यांना सहभागी होता यावे इतपतच झाले, पर्यायी आणि स्त्रीवर्ती विकास-प्रतिमान पुढे रेटण्याच्या दृष्टीने ते अगदीच तुटपुंजे ठरले. पंचायत पातळीपासून संसदेपर्यंत त्यांना कुठेच न्याय्य प्रमाणात प्रतिनिधित्व प्राप्त झाले नाही. समान पातळीवर राजकीय सहभाग करण्याच्या इतर आघाड्या तर त्यांच्यापासून दूरच राहिल्या. प्रासंगिक आंदोलनांच्या वेळी त्यांना सोबत घेऊन चालणाऱ्या कामगार चळवळींनी आणि राजकीय पक्षांनीही त्यांना अंतर्गत सत्तास्थानांपासून दूरच ठेवले. तिसरी संसद गाजवणाऱ्या तेजस्विनींचे कौतुक करणाऱ्या मधू लिमयेंना स्त्री-पुरुष समतेचा कैवारी असा आपला पक्ष एकही स्त्री-खासदार निवडून आणू शकला नसल्याची खंत नोंदवणे भाग पडले!

या पार्श्वभूमीवर १९८८ ते २००० या कालावधीसाठी तयार केल्या गेलेल्या राष्ट्रीय परिप्रेक्ष्य योजनेने स्त्रियांसाठी

तीस टक्के जागा पंचायत समिती व जिल्हा परिषदेत आरक्षित ठेवण्याची शिफारस केली. यथावकाश ७३ व ७४ या सांविधानिक विशोधनांद्वारे ती सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अंमलातही आली. एका परीने ती संविधानकर्त्यांना अपेक्षित असलेल्या सामाजिक उद्दिष्टपूर्तीच्या अपयशाची कबुली होती. तसेच स्त्रियांच्या चळवळींनी त्या प्रश्नावर केलेल्या शक्तिप्रदर्शनाला मिळालेला तो सकारात्मक प्रतिसाद होता. दलितांप्रमाणे स्त्रिया हा एकजिनसी राजकीय प्रवर्ग कितपत म्हणता येईल, असा किंतू मनात असणाऱ्या राजकीय भाष्यकारांनाही हा निर्णय एकूण स्वागतार्हच वाटला. देशाच्या राजकीय प्रक्रियांमधील स्त्रियांचा सहभाग त्यातून वाढला तर ते या राज्यव्यवस्थेच्या लोकशाही भवितव्यासाठी हितावह होईल; शिवाय अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढणाऱ्या स्त्री-चळवळींची त्यामुळे ताकदही वाढेल, असा त्यांचा अभिप्राय पडला. आरक्षणतत्त्वाचा पूर्वानुभव पाहता हा त्यांचा अभिप्राय अनाठायी म्हणता येणार नाही.

पण स्त्री-आरक्षण विधेयक संसदेसमोर मांडले गेले तेव्हा ज्यांच्याकडून त्याच्या जोरदार समर्थनाची अपेक्षा होती त्यांनीच त्यास कडाडून विरोध केला. सभागृहाबाहेरही त्या विरोधाचे प्रतिसाद उमटले. त्या विरोधकांचा मुख्य युक्तिवाद असा होता की, ते स्त्रियांना आरक्षण देण्याविरुद्ध नाहीत, पण आहे त्या स्वरूपात या विधेयकाद्वारे स्त्रीवर्गाचे योग्य प्रतिनिधित्व साध्य होणार नाही. स्त्रियांपैकी ज्या उच्चवर्गीय/वर्णीय, शहरी, शिक्षित व वाग्मी असतील त्याच या जागा बळकावून बसतील. या तथाकथित स्त्रीवादी महिलांना तळागाळांतील कष्टकरी महिलांच्या समस्या मुळीच ठाऊक नसणार तेव्हा त्या कशा काय त्यांना वाचा फोडू शकतील? यावर उपाय म्हणून त्यांनी अशी मागणी केली की स्त्रियांसाठी आरक्षित केल्या जाणाऱ्या एकूण जागांपैकी विशिष्ट कोटा इतर मागासवर्गीय जातींच्या तसेच अल्पसंख्याक गटातील महिलांसाठी राखून ठेवला जावा. अशा प्रकारे आरक्षणांतर्गत आरक्षणाची तरतूद करून हे विधेयक पुन्हा मांडले गेले तर त्याला पाठिंबा देता येईल!

हा विरोध संसदेत आकस्मिकपणे व्यक्त झाल्यामुळे तसेच बऱ्याच अंशी तो असंसदीय पद्धतीने केला गेल्यामुळे त्या मागच्या अंतस्थ हेतूंबद्दल तेव्हा शंका प्रदर्शित करण्यात आल्या. त्या रास्तही असू शकतील, पण तेवढ्यामुळे हा आक्षेप निराधार ठरवून उडवून लावता येणे मात्र कठीण आहे. भारतीय समाजवास्तवाची तोंडओळख असणाऱ्या कोणालाही हे सहज पटेल की वर्ण-जात-धर्म-प्रदेश-वर्गनिरपेक्ष असे स्त्रीत्व किंवा स्त्रीविषयक प्रश्न या देशात अद्याप तरी ठळकपणे पुढे आलेले नाहीत. स्त्री हे येथे अनेक भिन्न अस्मितांना सोयीसाठी दिले जाणारे केवळ एक औपचारिक नामाभिधान आहे. स्त्रियांचा वेगळा राजकीय पक्ष त्यामुळेच येथे धड उभा राहण्यापूर्वीच निकालात निघाला होता. उदारमतवादी लोकशाहीतील सार्वत्रिक प्रौढ मताधिकारातून पुरुष मतदारांच्याही जिथे पारंपरिक, सामूहिक अस्मितांना छेद जाऊन तत्त्ववैचारिक, वर्गीय वा पक्षीय अशा सर्वस्पर्शी अस्मिता अस्तित्वात आलेल्या नाहीत तिथे धडपणे राजकीय सहभागही न घडलेल्या स्त्रीमतदारांत त्या कुठून साकार होणार? धर्मनिहाय व जातिनिहाय स्त्रियांच्या समस्याच केवळ वगळल्या असे नव्हे तर दर्जा आणि हक्कांबाबतही स्पष्ट तफावत दिसून येते. त्यामुळे कोणी जर या वस्तुस्थितीचा हवाला देऊन आरक्षणांतर्गत आरक्षणाचा आग्रह धरला तर तो समजून घ्यायलाच पाहिजे.

संविधानातील समतातत्त्वाचा भंग स्त्रियांना आरक्षण दिल्यामुळे होतो हा आरक्षणांविरुद्धचा सर्वसाधारण आक्षेप स्त्री-आरक्षणाबाबतही आहे आणि दलितांच्या आरक्षणांच्या संदर्भात त्याचा जो प्रतिवाद केला जातो तोच येथेही करता येईल. या देशातील विशिष्ट सामाजिक परिस्थितीत एक आपद्धर्म म्हणून आरक्षणांचा अवलंब करण्यावाचून गत्यंतर नाही. आरक्षणे फक्त आरक्षणपात्र समाजघटकांच्याच नव्हेत तर संपूर्ण समाजाच्या हिताखातर दिलेली आहेत आणि जोपर्यंत आरक्षणाच्या परिघाबाहेर संबंधित समाजघटकाला योग्य प्रतिनिधित्व प्राप्त होत नाही तोपर्यंत आरक्षणे अंमलात



Action replay greets women's quota bill in LS

The Times of India News Service
NEW DELHI: The uproar witnessed in the Lok Sabha on Thursday over the controversial women's reservation bill had a familiar ring to it.
In a replay of the drama enacted during every parliament session, the government listed the bill for discussion on Thursday—a day before the winter session draws to a close. As forewarned by the opponents of the bill, members of the Samajwadi Party—supported by the Bahujan Samaj Party (BSP) ... Janata Dal ... well of
(U), joined the others in opposing the bill while Trinamul Congres[s] chief Mamata Bannerjee could b[e] heard shouting slogans in suppo[rt] of the bill.
In the Rajya Sabha, the ... faced the wrath of women m[em]bers who virtually gheraoed ... on this issue, resulting in a[n] adjournment. The PM, ho[wever,] remained unruffled and t[old] women jocularly that he c[ould] withdraw the bill from ... Sabha and bring it to t[he] house instead.
The all-party meetin[g] ... Mr Balayogi in the mo... to break the impasse ... Singh Yad...

राहणारच असा तो त्रिविध प्रतिवाद आहे. स्त्रियांना आरक्षणे दिल्यास बीबी बेटी ब्रिगेड्स तयार होतील, हा आक्षेपही फारसा गंभीर प्रतिवाद करण्याच्या लायकीचा नाही. तेव्हा अंतर्गत कोट्याचाच तेवढा आक्षेप शिल्लक उरतो.

त्या आक्षेपातील तथ्यांश वर आपण पाहिल्याप्रमाणे मान्य केला तरी काही प्रश्न मात्र अनुत्तरित राहतातच आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधताना आरक्षणविषयक वितंडेतील 'खऱ्या राजकारणावर' प्रकाश पडल्यावाचून राहत नाही. ते प्रश्न असे : स्थानिक स्वराज्य संस्थांत स्त्रियांसाठी आरक्षण ठेवताना ज्यांनी फारशी खळखळ केली नव्हती त्यांनी विधिमंडळांत ते देताना एवढे आकांडतांडव का करावे? स्त्रियांसाठी तेहतीस टक्के आरक्षण एकदा पदरात पाडून घेतल्यानंतर मग तदंतर्गत विशिष्ट कोट्यांसाठी संघर्ष करण्याऐवजी त्या आरक्षणाचीच शक्यता नष्ट करण्याचा आततायीपणा का केला जातो? उच्चवर्णीय/वर्गीय स्त्रिया समस्त स्त्री-वर्गाचे प्रतिनिधित्व करू शकणार नाहीत याचा त्या स्त्रियांच्या वैगुण्यांवर दोष किती आणि प्रतिनिधित्वाच्या अंगभूत मर्यादांचा वाटा किती? विशिष्ट जातीचे लोकप्रतिनिधी त्यांच्या जातिसमूहाचे प्रतिनिधित्व कितीसे करतात? अनुसूचित जाती-जनजातींच्या प्रतिनिधींनी आपापल्या मतदारवर्गाचे नीट प्रतिनिधित्व आजवर केलेले नसेल तर ते केवळ अंतर्गत आरक्षण नसल्यानेच का? अंतर्गत आरक्षणाचे तर्कशास्त्र जाती-उपजाती-पोटजाती व त्यांचे प्रादेशिक गट असे किती पुढे नेता येईल? अनुसूचित जातींपैकी पूर्वीच्या महार समाजानेच आणि त्यातही अभिजन पोटजातींनीच आरक्षणांचे लाभ लुटले, अशी रास्त टीका केली जाते. त्यावर दोन प्रश्न उपस्थित होतात. एक, अंतर्गत आरक्षण असण्यातून असा किती फरक पडला असता? आणि दुसरा असा की हे न्यून दूर करण्याचे अधिक ठोस मार्ग महाराष्ट्रातील काँग्रेसेतर पक्षांनी वापरून अन्य अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व मिळवून दिले की नाही? सार्वत्रिक प्रौढ मताधिकार पद्धतीचे एक सर्वमान्य तत्त्व असे आहे की त्यातून प्रातिनिधिक मंडळांची रचना आपोआपच समाजरचनेशी सुसंवादी होत जाते. कोणत्याही विधिमंडळाची सामाजिक रचना आज पन्नास वर्षांपूर्वी होती तीच कायम राहिलेली नाही. उच्चवर्णीय/वर्गीयांचा एकेकाळी शंभर टक्के प्रभाव असलेल्या या विधिमंडळांमध्ये आज मध्यम व निम्न जाती/वर्गीयांचे संख्याबळ लक्षणीय प्रमाणात वाढले आहे. ही जी प्रक्रिया सर्वसाधारण प्रतिनिधींबाबत घडून आली तीच स्त्रियांच्या आरक्षित जागांबाबतही अपरिहार्यत: होणार आहे, हे स्पष्ट असताना असा उतावीळपणा का केला जात आहे?

पंचायत राज्यांतर्गत संस्थांमध्ये आरक्षण दिल्यामुळे स्त्रियांना जो राजकीय अवकाश प्राप्त होणार होता, तो विधिमंडळांत



असणाऱ्या नेतृत्वाच्या प्रभावक्षेत्राचा साक्षात संकोच करणारा नव्हता किंवा त्यांचे पक्षांतर्गत स्थानही आव्हानित करू शकणारा नव्हता. विधिमंडळातील स्त्री-आरक्षणातून मात्र त्यांचे पक्षगत व संसदीय असे उभयपक्षी पुढारपण तात्काळ आणि प्रत्यक्षपणे संकटात येण्याची स्पष्ट शक्यता दिसत होती, असे एक कारण स्त्री-आरक्षण विधेयकाला विरोध करण्यामागे काही भाष्यकारांना आढळले आहे. अन्य काहींच्या मते मात्र पंचायत राज्याच्या विविध संस्थांमध्ये स्त्रियांना राखीव जागा दिल्यानंतर त्याचे जे अनपेक्षित परिणाम पुढे आले त्यामुळेच पुरुषसत्ताक मानसिकता खळबळून जागी झाली आणि स्त्री-आरक्षण विधेयकाच्या विरोधात उभी राहिली असावी.

आरक्षणाद्वारे सभागृहात एकतृतीयांश स्त्री-सभासदांचा भरणा होणार आणि विशेषत: हे आरक्षण फिरते असल्यामुळे कधी ना कधी ते आपल्या मतदारसंघालाही लागू होणार आणि आपले राजकीय भवितव्यच संपुष्टात येणार, अशी भीतीही काही खासदारांना वाटली असावी. एक गोष्ट स्पष्टच आहे की आरक्षणाचे स्त्रियांच्या व राष्ट्राच्या दृष्टीने संभवणारे दूरगामी इष्ट परिणाम ध्यानात घेऊन त्यांचे समर्थन करण्यापेक्षा त्या आरक्षणाचे ताबडतोबीचे स्वहितविरोधी परिणाम पाहून हवालदिल होण्यातून आरक्षणविधेयक हाणून पाडण्यास खासदार प्रवृत्त झाले असावेत, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे. तसे नसते तर आधी सर्व स्त्रियांसाठी आरक्षणाची हमी मिळवून मग अंतर्गत कोट्यांचा विचार त्यांनी केला असता किंवा लोकशाही प्रक्रियेद्वारे आरक्षित जागांवरही बहुजन समाजातील स्त्रीप्रतिनिधी निवडून येईपर्यंत सबूर धरली असती. पण त्या दोन्ही तर्कसंगत प्रतिक्रिया त्यांच्याकडून विधेयकास मिळाल्या नाहीत.

प्रत्येक गोष्टीकडे 'उच्चजातीयांचे कारस्थान' अशाच एका सोयिस्कर आणि सरधोपट दृष्टीने पाहण्याची सवय लागलेल्या या मंडळींनी स्त्री-आरक्षणाकडेही त्याच दृष्टीने पाहिले. राजकारणात मध्यम आणि निम्न जातींची सरशी होत असल्यामुळे ज्यांची धाबी दणाणली आहेत, अशा सर्वांनी स्त्रियांना आरक्षण देऊन त्याद्वारे उच्च जातीय सभासदांचे सभागृहांतील संख्याबळ वाढविण्याच्या एकमेव हेतूने या आरक्षणांचा घाट घातला आहे, अशी समजूत विधेयकाला विरोध करण्यामागे दिसते. गुजरात, कर्नाटक वगैरे राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना आरक्षण मिळाल्यानंतर त्यातील वरचढ जातींच्या संख्याबळात भर पडली, ही वस्तुस्थिती असल्यामुळे राज्यांच्या विधिमंडळांत व संसदेतही तसे होईल, ही भीती अगदीच निराधार म्हणता येणार नाही. पण थोडा लांबचा विचार केल्यास ही वस्तुस्थिती अशीच राहण्याची मुळीच शक्यता नाही; उलट अनेक दृष्टींनी स्त्रियांचे आरक्षण उपयुक्त व उपकारक ठरण्याचीच शक्यता मात्र मोठी आहे, हे सहज ध्यानात येऊ शकले असते. पण तसे झाले नाही.

अंतर्गत आरक्षण ओबीसी व मुस्लिम स्त्रियांना दिल्यास त्या घटकांमधील शोषित-वंचितांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व विधिमंडळात योग्य प्रकारे होईल किंवा त्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांना वाचा फुटेल, अशी खात्री पूर्वानुभव लक्षात घेता बाळगण्याची सोय नाही. मतदार-प्रतिनिधी यांच्यातील दुरावा विधिमंडळांची सामाजिक रचना बदलल्यानंतरही फारसा उणावला नाही, ही इतिहासाची साक्ष आहे. त्याची कारणे काय आहेत आणि त्यावर उपाय कोणते करायला हवेत, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. येथे (आरक्षणापुरते बोलायचे तर अनुसूचित जाती-जनजातींच्या बाबतीत असे दिसते की, आरक्षणातून नेत्यांचा एक आत्महितरत, संधिसाधू आणि सत्तेसाठी/लाभांसाठी तत्त्वशून्य तडजोडी करणारा वर्ग निर्माण झाला आहे. तळागाळांतील स्वजनांपासून तो बराचसा दुरावला आहे. आरक्षणांतर्गत आरक्षणाचा लाभ मिळवून विधिमंडळात निवडून आलेल्या स्त्री-प्रतिनिधींबाबतही हेच होण्याची शक्यता कोणालाच नाकारता येणार नाही.)

स्त्रियांचे स्त्रिया म्हणून असलेले सामाईक हितसंबंध आपल्या समाजात फारसे संघटित होऊ शकलेले नाहीत आणि प्रबळ पृथक अस्मितांच्या चौकटीत परिबद्ध असलेल्या येथील स्त्रियांबाबत ते घडणेही दुरापास्तच होते, याबद्दल दुमत संभवत नाही. पण त्या पृथक अस्मितांच्या भिन्न हितसंबंधांच्या रक्षणाचा किंवा वेगळाल्या समस्यांच्या निराकरणाचा आरक्षणाखेरीज दुसरा मार्गच स्त्री-आरक्षण-विरोधकांना का दिसू नये? त्यांना त्या हितसंबंध व समस्यांबाबत खरोखर आस्था असल्याचे ठोस पुरावे त्यांच्या पक्षीय ध्येयधोरणांतून व कार्यक्रमांतून कितपत जनतेपुढे आले आहेत? कष्टकरी मागास जातीय स्त्रियांच्या आणि मुस्लिम तलाकपीडित भगिनींच्या व्यथावेदनांशी या मंडळींची जवळीक पोशाखी स्त्री-मुक्ती चळवळींच्या प्रवर्तकांपेक्षा कितीशी जास्त आहे? त्यांनी त्या स्त्रियांना आपल्या पक्षाची उमेदवारी देण्याबाबत किती पुढाकार दाखवला आहे? या प्रश्नांची उत्तरे त्यांचा त्या स्त्रियांबाबतचा आजचा कळवळा जातिवंत असल्याचे सिद्ध करणारी नाहीत. त्यामुळेच त्याची कारणे अन्यत्र शोधणे भाग पडते आणि ती त्यांच्या तात्कालिक राजकीय हिशोबीपणात किंवा त्यांच्या पुरुषसत्ताक मानसिकतेतच गवसतात.

❑❑




# अध्यक्षीय भाषण

**प्राचार्य एन. डी. पाटील**

आजच्या या अतिशय जिव्हाळ्याच्या कार्यक्रमासाठी दिल्लीहून उपस्थित राहिलेले आपले आजचे प्रमुख पाहुणे डॉ. अहमद, ज्यांच्या उपक्रमामधून आजचा हा कार्यक्रम साकार होतोय,असे आमचे मित्र सुनील देशमुख, ज्यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आणि आज नाशिककरांना चांगल्या कार्यक्रमाची संधी उपलब्ध करून दिली त्या 'केशव गोरे ट्रस्ट'च्या अध्यक्षा आणि आमच्या ज्येष्ठ सहकारी मृणालताई गोरे, प्राध्यापिका पुष्पाताई भावे आणि या ठिकाणी ज्यांना पुरस्कार देण्यात आला ते सर्व गौरवमूर्ती, खास करून आता ज्यांचं भाषण आपण ऐकलं ते आचार्य शांताराम गरूड, ज्यांच्याबरोबर आम्ही गेली तीस-चाळीस वर्षे काम करीत आलो ते सर्व या ठिकाणचे गौरवमूर्ती, विशेषत: चंद्रपूरमधून, यवतमाळमधून म्हणजे महाराष्ट्रातले जे उपेक्षित विभाग आहेत, वेगवेगळ्या तऱ्हेनं आपल्या देशात जे वंचित लोक आहेत, कुणी शिक्षणाला वंचित आहेत, कुणी वेगवेगळ्या कारणांनी वंचित आहेत, अशा सर्व वंचितांमध्ये काम करणारे परंतु या ठिकाणी ज्यांनी हजेरी लावली ते सर्व गौरवमूर्ती आणि या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो. आज आपण डॉ. अहमद म्हणाले, त्याप्रमाणे खरोखरच एका अभूतपूर्व आव्हानांमधून जातो आहोत. बोगद्यामधनं वाटचाल असावी आणि वाटचाल करीत असताना असं वाटावं की आणि किती काळ चालावं लागणार आहे, बोगदा संपणार आहे की नाही? संपणार असेल तर केव्हा संपणार आहे? तो बोगदा संपेपर्यंत माझे पाय मला साथ देणार आहेत की नाहीत, असं वाटावं, अशा तऱ्हेच्या एका विचित्र परिस्थितीतून आज आपण जात आहोत. खरं म्हणजे महाराष्ट्रामध्ये मघाशी आचार्य गरूड म्हणाले की, गांधींनीदेखील सर्टिफिकेट दिलं होतं की, महाराष्ट्र हे कार्यकर्त्यांचं मोहोळ आहे. खरं आहे. आपण जर पाठीमागे दृष्टी टाकली तर अशी अनेक माणसं भेटतात ज्यांनी कुणाचीही पर्वा केली नाही. रात्रीच्या वेळी एखादा एकतारीवर भजन करणारा माणूस स्वत:च्याच तालात, स्वत:च्याच सुरात असा भजन म्हणत जात असतो. आपलं भजन कोण ऐकतंय की नाही, कशाची पर्वा नाही. अशा तऱ्हेने देखील काम करणारी माणसं या महाराष्ट्रात झालेली आहेत आणि या माणसांनी आजची जी वैचारिक शिदोरी आहे, ती तुमच्यासाठी, माझ्यासाठी ठेवली पण आज मात्र असं वाटायला लागलंय, की आम्ही या वैचारिक

शिदोरीचे वारस व्हायला खरोखरच पात्र आहोत का? आम्ही करंटे तर नाहीत ना! असं वाटावं अशा तऱ्हेची परिस्थिती आज आहे. हे नाकारू नये, कारण आपण जर आजच्या परिस्थितीचं भान ठेवलं नाही. किती खोल पाण्यात आज आपण उभे आहोत, हे खरोखरच समजावून घेण्याची गरज आहे आणि म्हणून मला असं वाटतं की, मघाशी डॉ. अहमदांच्या भाषणामध्ये एक मुद्दा आला की, मुसलमानांच्या मागासलेपणाची चर्चा झाली. आपण पाहिलंय की, जे समाज शिक्षणात मागासलेले आहेत ते अनेकदृष्ट्या मागासलेले राहतात, वैचारिकदृष्टया मागसलेले राहतात, आर्थिकदृष्ट्यादेखील विपन्नावस्थेत जगतात—आणि मग त्यांनी मघाशी जे विश्लेषण केलं ते आपण लक्षात घेणार आहोत का? त्यातला बराचसा समाज दरिद्री आहे, मागासलेला आहे, म्हणजे काय? तर तो आपल्या परंपरागत व्यवसायामध्ये गुंतलेला आहे. सहज म्हणून एक उदाहरण देतो. मुसलमान पिंजाऱ्याचा मुलगा जर पुन्हा पिंजारीच होत असेल आणि पिंजारी होण्याशिवाय जीवनात त्याला कुठलाही मार्ग उपलब्ध नसेल, शिक्षणाच्या अभावातून असेल, आणखी कशातून असेल, तर याचं समर्थन कसं करायचं, हे कसं बदलायचं? का पिंजाऱ्याच्या मुलाने पिंजारीच व्हावं? आज परिस्थिती तशी आहे. मला कोल्हापूरला एकवेळ हा अनुभव आलेला आहे. माझी मला लाज वाटली त्या दिवशी. मी कोल्हापूर शहराचा त्यावेळी आमदार होतो आणि कोल्हापूरामध्ये जिथे भंग्यांची वस्ती आहे, तिथे मी गेलो आणि त्यांना म्हटलं, "तुमची मुलं, परंपरेने तुम्ही भंगीकाम करत आलात, आपण यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे." तो म्हणाला, "मी एका मोठ्या संस्थेशी संबंधित आहे. तुमच्यातली जी काही मुलं शाळेत जात नसतील ती मुलं मी घेतो आणि सातारला नेऊन त्यांची बोर्डिंगमध्ये व्यवस्था करतो." कर्मवीर भाऊराव पाटलांनी अशी अनेक मुलं आणली. काही मुलांना चालण्यासारखी ताकद नव्हती, त्यांना खांद्यावरून आणलं. त्यातलं एक किडमिडं मूल कोल्हापूरच्या विद्यापीठाचं कुलगुरू झालं, बॅरिस्टर पी. जी. पाटील. त्याच्याजवळ कोल्हापुरातून सांगलीपर्यंत चालत येण्याची ताकद नव्हती. भाऊराव पाटलांनी त्या पोराला खांद्यावर घेतलं आणि त्या मुलाने पुढे मुंबईच्या युनिव्हर्सिटीमध्ये बी.ए.च्या परीक्षेत इंग्रजीमध्ये पहिला नंबर मिळवून इंग्लिश प्राईज मिळवलं. एका खेड्यातला मुलगा. बुद्धीची कुठे विषमता नाही, विषमता आहे ती संधीची आहे आणि या संधीच्या विषमतेचा हा सारा परिणाम होता. मी त्यांना म्हटलं, या मुलांना घेऊन मी साताऱ्याला जातो. ते सगळं माझं त्यांनी ऐकलं. बाकीची बरीचशी माणसं काही बोलत नव्हती. एक त्यातला म्हातारा, म्युनिसिपालिटीच्या सेवेतून निवृत्त झालेला, त्याने माझ्या डोळ्यांत अंजन घातलं आणि माझं मलाच, सामाजिक प्रश्नांची आपली जाण किती त्रोटक आहे, हे जाणवलं. तो म्हणाला, की साहेब तुमचं सगळं खरं आहे आणि तुम्ही आमच्या मुलांना शिकवालदेखील, पण तुम्हाला एक सांगू, ह्या खोलीत, ज्यात आपण बसलोय ही खोली माझ्या वडलांना म्युनिसिपाल्टीने दिली. माझा वडील भंगीकाम करत होता. माझा वडील निवृत्त झाल्यावर ही खोली मला मिळाली. मी भंगीकाम केलं तेव्हा मिळाली, त्या अटीवर मिळाली आणि आता मी निवृत्त व्हायचोय आणि माझं आता मूल आहे. हे भंगी झालं नाही तर माझ्या डोक्यावरचं छप्परच जाईल. मला दुसऱ्या वस्तीमध्ये रहायला जागा मिळत नाही आणि ही खोली म्युनिसिपाल्टी माझ्याकडे ठेवणार नाही. माझ्या मुलाने भंगीकाम केलं तर भंग्यासाठी ही खोली आहे आणि मग त्या दिवशी माझ्या तोंडून एक शब्दही निघाला नाही. मी मुकाट्याने, माझी मलाच माझ्या अज्ञानाची लाज वाटली म्हणा आणि मी तिथून निघून आलो. समाजातले प्रश्न असे आहेत. आज इकडे आमच्या बीड जिल्ह्यामधले सात लाख शेतमजूर ऊस तोडायला येतात. तुमच्या नाशिक जिल्ह्यातही येत असतील. कारण नाशिक जिल्ह्यातल्या लोकांना ऊस लावायचा नाद आहे, तोडायचा नाही. मी सांगली जिल्ह्यातला आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे इथं ती माणसं ऊस तोडायला येतात. त्यांची काय परिस्थिती आहे? त्यांची मुलं निरक्षर राहातात. तुम्ही असं मानता आहात, आज कदाचित प्राध्यापकाचा मुलगा प्राध्यापक होईल, डॉक्टर होईल, वकील होईल, इंजिनिअर होईल, आर्किटेक्ट होईल. त्याला कोणताही निराळा पर्याय उपलब्ध आहे. मघाशी जसं मी म्हणालो, पिंजाऱ्याच्या मुलाला काय पर्याय आहे? शेतमजुराच्या मुलाला काय पर्याय आहे? ज्याला तुम्ही शिक्षण नाकारलं एकावन्न वर्षांच्या स्वराज्यानंतरही ज्याला आपण शिक्षण नाकारलं त्यांच्यापुढं आम्ही काय पर्याय ठेवलाय? म्हणजे आर्थिक क्षेत्रामधील नवीन वर्णव्यवस्था आम्ही निर्माण करत नाही! की शेतकऱ्याच्या मुलाने शेतमजूरच व्हावं, पिंजाऱ्याच्या मुलाने पिंजारीच व्हावं आणि भंग्याच्या मुलाने भंगीच व्हावं. एकावन्न वर्षांच्या स्वराज्यानंतरही आपण काय फरक पाडलाय, हे सारे प्रश्न आज आपल्यापुढे आव्हान घेऊन उभे आहेत. या साऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधायची आहेत आणि ही उत्तरं शोधताना सर्वात जर आपलं काही नुकसान झालं असेल तर स्वातंत्र्यपूर्वकालामध्ये परकीयांशी लढतानादेखील आपण हिंदू आणि मुसलमान एकत्र होतो,

रक्त सांडलं तर हिंदू आणि मुसलमानांचं रक्त एकाच ओहोळात जात होतं. आज मात्र प्रत्येकाला वाटतं मी हिंदू आहे. दुसऱ्याला वाटतं मी मुसलमान आहे. या नव्या भिंती तयार झाल्यात. पूर्ण कोरा कागद घेतला म्हणजे कसा दिसतो आणि ग्राफ पेपर घेतला म्हणजे कसा दिसतो, त्या ग्राफ पेपरमध्ये चौकोन आहेत, त्या चौकोनात चौकोन आहेत. बारीक बारीक. म्हणजे जो कागद आहे, तो आम्ही इतका विभागलेला आहे. जेवढे बारीक चौकोन आणि त्या चौकोनातसुद्धा दाखवता येत नसतील म्हणून नसतील, पण ते दुसरे चौकोन आहेत आणि म्हणून आज भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याला आव्हान देणाऱ्या शक्ती म्हणून ज्यांचा उल्लेख आचार्य गरूड यांनी केला. याच्याविरुद्ध आपल्याला आता लढायचंय. तर या ज्या शक्ती आहेत त्या बळकट होताहेत. म्हणजे समाजपरिवर्तनवाद्यांचा आवाज क्षीण होतोय आणि बाकीच्यांचा आवाज अधिक ऐकला जातोय. बोलणाऱ्यांच्या एरंड्या विकल्या जातात आणि न बोलणाऱ्याचे बनशी गहू कुणी घेत नाहीत, तशी आज आमची अवस्था झालीय. आमचे बनशी गहू घ्यायला कुणी तयार नाहीत. तर या साऱ्या परिस्थितीमध्ये आपणाला ही सारी परिस्थिती बदलण्याची आव्हानं घ्यायची आहेत आणि म्हणून मला असं वाटतं. मघाशी डॉ. अहमद म्हणाले, यामध्ये संयुक्त प्रयत्नांची गरज आहे. आज हे प्रयत्न होत आहेत पण अलग अलग आहेत. अलग प्रयत्नांनी काही व्हायचं नाही. काही शक्ती नुसत्या जातींच्या विरुद्ध लढताहेत, काही शक्ती वर्गाच्या लढ्यांमध्ये आहेत आणि या शक्ती अलग अलग राहिलेल्या आहेत. समांतर अशा काम करताहेत, असं अनेक वेळा घडलेलं आहे आणि त्यामुळे दुसऱ्या वर्गाला पाहिजे तेवढा विश्वास वाटलेला नाही. मी चाळीस वर्षांपूर्वी मुंबईच्या गिरणीकामगारांमध्ये काम करणारा कार्यकर्ता होतो आणि मला आठवतं मुंबईच्या गिरणीकामगारांमध्ये कॉम्रेड डांग्यांनी तेरा रुपयांवर काम करणाऱ्या कामगारांमध्ये अभूतपूर्व विश्वास निर्माण केला की आशिया खंडातलं एक अग्रदल म्हणजे मुंबईचा गिरणीकामगार; कमी पगारावर काम करणारा पण वर्गभूमिकेतून लढणारा,पण तिथेसुद्धा महत्त्वाची उणीव भासली. तिथे एका विशिष्ट खात्यामध्ये त्यावेळी, तुम्ही ज्यांना अस्पृश्य म्हणत होता, त्या अस्पृश्य कामगारांना (त्या खात्यामध्ये) प्रवेश नसायचा आणि त्याच्याविरुद्ध आमची चळवळ लढली नाही, असं मला वाटतं. सहा महिन्यांचा अधिक आठ तासांचा दिवस मिळण्यासाठी आम्ही लढलो असू, आमच्या अनेक भगिनींच्या बांगड्या फुटल्या असतील, अनेक कामगारांची टाळकी फुटली असतील पण एका विशिष्ट खात्यामध्ये तो अस्पृश्य आहे म्हणून त्या ठिकाणी प्रवेश मिळत नाही, याच्याविरुद्ध आमची वर्गवादी चळवळ लढली नाही. साहजिकच त्याच्यामध्ये अंतर राहतं. हे सारे दोष आमच्या चळवळीमध्ये आहेत, वर्गवादी चळवळीमध्ये दोष आहेत. आम्ही असे समांतर काम करीत राहिलो आणि म्हणून डॉ. अहमदांच्या बोलण्यामधला, मला महत्त्वाचा आशय वाटला हा की संयुक्तपणे लढायला पाहिजे. ते मुहल्ला कमिटीची भाषा बोलत होते. स्थानिक कमिट्या करा आणि तिथले प्रश्न उचला. रूढी सगळीकडेच आहेत, शिकलेली माणसं रूढीवादी झालीत आता याला काय करावं? पूर्वी शिकलेली माणसं ही शहाणी असतात, ती विचारानं वागतात, असं मांडलं जात होतं आणि न शिकलेल्या माणसांमध्ये आपण दोष शोधत होतो, आता तसं नाही वाटत. चांगली शिकलेली, शिंगं मोडून वासरात जाणारी माणसं दिसतात. दहा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. पाऊस पडत नव्हता आणि आमच्या मुंबईच्या राज्यपालांनी सगळ्या महाराष्ट्रातल्या शाळेतल्या मुलांना अकरा वाजता प्रार्थना करायला सांगितली. पाऊस पडावा म्हणून प्रार्थना. आता जग कुठं चाललंय आणि आम्ही कुठे? प्रार्थना केल्याने पाऊस पडतोय का? आता प्रार्थना केल्यावर कदाचित पाऊस पडलाही असेल पण प्रार्थना करण्यापूर्वी पाऊस पडला त्याचं काय? त्याची चर्चा कुणी करत नाही. त्यामुळे मला असं वाटायला लागलं की शिक्षण मिळूनसुद्धा शिक्षणामध्ये जर आशय नसेल तर समाज बदलतो हे गृहिततत्त्व चुकीचं ठरायला लागलंय. म्हणजे 'सा विद्यायाः विमुक्तये' ही ती विद्या की जी मला साऱ्या जळमटातून मुक्त करते. जुन्या कल्पनांमधून, रूढींमधून पण आज तर रूढींचा मोठा पगडा आहे. तर काय फरक एवढाच आहे की जी निरक्षर माणसं आहेत, ती बहिरोबाला जातात, म्हसोबाला जातात आणि शिकलेली माणसं साईबाबाला जातात. फरक कुठेय? फार फार फरक त्याच्या त्याच्या आर्थिक कुवतीत. बहिरोबा, म्हसोबा मागतो एखादं कोंबड्याचं पिल्लू. तिथे जाऊन तीन हजाराची खोली बुक करावी लागत नाही. बहिरोबा, म्हसोबा आपली स्वस्तातली वस्तू आहेत. ही स्वस्तातली आणि इकडे जाणारी माणसं यात फरक काय आहे आणि म्हणून मला असं वाटतंय आपल्याला ह्याच्या मुळात जायला लागेल आणि मुख्यतः ही धर्मनिरपेक्षतेची लढाई आहे. ही लढाई पहिल्यांदा लढायची, रूढीइतकीच. कारण काय आहे, धर्मनिरपेक्षतेच्या लढाईत आपण अयशस्वी झालो, धर्मांधतेच्या विरुद्ध आपण तोकडे पडलो तर आपला पुढचा संयुक्त लढाच होणार नाही आणि म्हणून आपल्याला सांगावं लागेल, धर्माचा संबंध कुठपर्यंत, धर्म इथपर्यंत. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या त्याच्या

विश्वासाप्रमाणं उपासना करण्याचं स्वातंत्र्य आहे. कुणी मशिदीत जाईल, कुणी मंदिरात जाईल, कुणी चर्चमध्ये जाईल, कुणी गुरुद्वारामध्ये जाईल आणि आमच्यासारखी देवळात न जाणारी. उपासना स्वातंत्र्यामध्ये उपासना न करण्याचंही स्वातंत्र्य आहे, असं मी मानतो. हे सारं टिकवायचं असेल तर लोकांना सांगावं लागेल, धर्म ही सर्वांना एकत्रित बांधणारी वस्तू, शक्ती असू शकत नाही, तशी जर असती तर इराण आणि इराक अकरा वर्षं लढत राहिले नसते. दोघंही अल्लाचं नाव घेत होते आणि लढत होते. का? इराक आणि इराणची लढाई कशी झाली आणि लांब कशाला काल परवापर्यंत पाकिस्तानचा भाग असणारा बांगलादेश फुटून स्वतंत्र झाला. मग धर्म त्याला एकत्र का बांधू शकला नाही? इस्लामचं वैचारिक सामर्थ्य एवढं जर प्रचंड असेल तर बांगलादेशाची निर्मिती व्हायला नको होती, ती थांबायला पाहिजे होती. नाही थांबली. एक धर्म आणि एक राष्ट्र अशीही कल्पना कुठेही नाही. आता अमेरिकेमध्ये आमचे सुनील देशमुख आहेत. त्यांना हद्‌पार करून बाहेर काढलंय का? असं नाही. एका राष्ट्रामध्ये एकाच धर्माचे लोक असावेत, असं काही नाही. किंवा असा कुठला धर्म नाही, की त्या धर्माचं एक राष्ट्र आहे सगळीकडे. मुसलमान धर्माची कितीतरी राष्ट्रं आहेत, ख्रिश्चन धर्म मानणाऱ्यांची कितीतरी राष्ट्रं आहेत. जर पाकिस्तानमधून बांगलादेश फुटून गेलेला असेल तर एकत्र येण्याची प्रक्रिया कशी असेल? तेव्हा 'एक धर्म एक राष्ट्र' ही संकल्पना चुकीची आहे. धर्माची विशिष्टता एका ठरावीक पातळीपर्यंत असते, त्याच्या पलीकडे धर्माला स्थान देता कामा नये. धर्माच्या गमजा वैयक्तिक आपल्या घरापुरत्या त्याच्याबाहेर तुमची तुम्ही स्वतंत्रं मतं मानावी लागतील. जर उद्या कुणीतरी म्हणायला लागलं, की 'अष्टवर्षा भयत्‌कन्या' असं आमच्या ग्रंथात लिहिलंय. मी माझ्या मुलीचं लग्न कोणत्या वर्षी करावं, हे तुम्ही कोण सांगणारे, टिकोजी असं जर मला विचारलं तर मी सांगतो "करून दाखव. तुझ्या मुलीचं लग्न अठरा वर्षाच्या आत करून दाखव, तुला बेड्या नाही घातल्या तर बघतो आम्ही." त्याची मुलगी आहे, त्याच्या मुलीचं लग्न त्याने करायचं आहे आणि त्याच्या धर्मग्रंथात कदाचित काही लिहिलं असेल. जसं मघाशी डॉ. अहमदनी तलाकचा उल्लेख केला, तो धर्मग्रंथात असेल, तो धर्मग्रंथ आज सामाजिक कसोटीवर टिकणार नसेल, तर धर्मग्रंथातील ही सारी मांडणी फेकून द्यावी लागेल, निर्धारपूर्वक फेकावी लागेल. तुम्हाला सामाजिक नियमांवर टिकावं लागेल, नाहीतर नाही. तुमचं जे मांडणं हे, ते सामाजिक दृष्टीयोग्य आहे का? परिवर्तनाला, समाजाला पुढं नेणारं आहे का? असेल तर चालेल नाहीतर नाही चालणार आणि म्हणून राज्यकर्त्यांवर कचखाऊ भूमिका घेतल्यानं अजूनही म्हणजे १८२९ तो कुठं, कोण, तुमचं माझं नातं नाही, असा तो लॉर्ड बेटिंग इथे आला आणि त्यानं सतीची चाल बंद केली आणि आज आमच्या नात्यागोत्यातली माणसं तिथे बसलेली आहेत आणि ती सतीच्या प्रथेचं गौरवीकरण, उदात्तीकरण करताहेत, त्यांना मदत करताहेत, त्या शक्तींना मदत करताहेत. मला अजून राहून राहून वाटतं की १८२९ मध्ये सतीची चाल बंद करण्याचा कायदा त्यावेळच्या सरकारनं केला ना त्यावेळी ईस्ट इंडिया कंपनीचं राज्य होतं. १८५८ मध्ये या देशात राणीचं राज्य आलं आणि नंतर या चळवळी मंदावल्या. संमती वयाच्या बिलालादेखील ज्या पद्धतीनं ट्रीटमेंट मिळाली त्यामुळे माझं असं मत झालंय राणीचा जाहिरनामा आणि आमच्या सरकारचा जाहिरनामा यात फरक कुठे आलाय. राणीच्या जाहिरनाम्यासारखंच सगळ चाललंय. मघाशी आचार्य गरुडांनी सांगितल्याप्रमाणे बोलतात एक आणि करतात एक. आमच्याकडे दारुबंदी खातं आहे आणि दारुबंदी खात्याचा मंत्री दारूची दुकान देतो. ह्याच्यापेक्षा आणखीन काही गमती असू शकतात. दारूची दुकानं आता लिलावात द्यायचं ठरलं म्हणजे काय? मग महात्मा फुल्यांचं नाव कशाला घेता? मी तर सांगतो जे राज्यकर्ते दारुची दुकानं देतात त्यांनी महात्मा फुल्यांचं नाव घेऊ नये. त्यांना महात्मा फुल्यांचं नाव घेण्याचा अधिकार नाही. १८८० मध्ये महात्मा फुले पुणे नगरपालिकेचे सदस्य होते आणि त्यावेळी त्यांनी ठराव मांडलेला आहे, की दारूच्या दुकानातून काही महसूल मिळतो, खरं आहे पण हा महसूल एक तऱ्हेची सामाजिक धूळधाण करून त्याच्यातून मिळतो. त्या महसुलाची किंमत आणि या महसुलासाठी जी सामाजिक धूळधाण करावी लागते त्याची किंमत आणि त्यांनी सांगितलं, की पुण्यामध्ये एकही दारूचं दुकान देता कामा नये; ठराव मांडला. आज दारूची दुकानं देणारे मंत्री, मुख्यमंत्री महात्मा फुल्यांचे नाव घेताहेत. तर ते परवलीचे शब्द बनलेले आहेत. एकूण महात्मा फुल्यांचं नाव घेतलं, की माझं काम संपलं. मग महात्मा फुले ज्या पद्धतीने सांगत होते ते ऐकण्याची माझ्यावर कुठंय जबाबदारी? त्यामुळे ही धर्मनिरपेक्षतेची वाटचाल करावी लागेल आणि त्यासाठी आपणाला महात्मा फुल्यांचा वारसा पुरेसा पडेल. महात्मा फुल्यांनी त्यावेळेला सांगितलं की, एकाच कुटुंबामध्ये भिन्न धर्माला भिन्न निष्ठा वाहणारी माणसं गुण्यागोविंदानं नांदू शकतात. बाप हिंदू, मुलगा मुसलमान, मुलगी यहुदी आणखीन कुणीतरी बौद्ध झालंय आणि आपआपल्या

धर्मग्रंथाचं वाचन करताहेत आणि सृष्टीच्या निर्मात्याला श्रद्धा वाहून निष्ठेने वर्तन करताहेत, हा कुणाला भ्रामक विचार वाटला असेल. कसं शक्य आहे? एकाच कुटुंबात भिन्न भिन्न धर्माची माणसं. आता तर भिन्न भिन्न धर्माची माणसं अंगावर येताहेत. पूर्वी चाळीत गुण्यागोविंदाने रहात होती, आता चाळीत गुण्यागोविंदाने रहायला तयार नाहीत, हे कसं होईल, त्याला आम्ही गमतीनं पुढचा युक्तिवाद करतो, "आजसुद्धा एका कुटुंबात भिन्न भिन्न राजकीय पक्षाची माणसं असतात की नाही, मतलबासाठी असेल. आहेत एकाच कुटुंबात भिन्न भिन्न राजकीय पक्षाची माणसं आहेत. बाप एका पक्षात, मुलगा एका. आता तर काँग्रेसचे दोन पक्ष झाल्यामुळे फारच सोय झालेली आहे. एकाने राष्ट्रवादी आणि एकाने राष्ट्रीय आणि एकाने सोनिया काँग्रेसमध्ये रहायचं. कुणाचं तिकिट मिळणार, जिकडं खोबरं तिकडं चांग भल. साधारणपणानं जमून जातं. हे कसं चालतं? त्याला उत्तर आहे. बापाला विचारावं, "तुमचा मुलगा तिकडे गेला का हो?" त्यांनी म्हणावं, "त्याचं काय आहे एन. डी. पाटील ज्याची त्याची मतं आहेत हो.' हा ज्याची त्याची मतं आहेत म्हणजे राजकीय मतं ज्याची त्याची आहेत. त्यालाच पुढे म्हणायचं धार्मिक मतंसुद्धा ज्याची त्याची असू देत. या तऱ्हेची सहिष्णुता पुन्हा एकवेळ आणावी लागेल, सोपं काम नाही. मघाशी म्हणालो त्याप्रमाणे बोगद्यातील वाट आहे, खरोखरच बोगदा केव्हा संपेल कळत नाही. बोगद्यातच आहेस ना आता, मग मागं जायला किती लागेल आणि पुढं जायला किती लागेल याचा अंदाज नाही ना, मग पुढेच का जात नाहीस. हा माझा त्यावरचा उपाय आहे. मागं कशाला जातोस, पुढच जा. केव्हाना केव्हातरी तिथं जाता येईल, बोगदा संपेल आणि मी तुम्हाला सांगतो जगाचा इतिहास असा आहे की, जगातल्या शेवटच्या माणसाला न्याय देण्यासाठी, तुम्हाला ही बोगद्यातील वाट चालावीच लागेल. ही बोगद्यातील वाट चालल्याशिवाय तुम्हाला शेवटच्या माणसापर्यंत जाता येणार नाही आणि म्हणून मला आजच्या या परिस्थितीमध्ये असं वाटतंय, की जे आज बोलताहेत, आपण निराश व्हायचं काही कारण नाही, तत्त्वज्ञानाचा शेवटच झालाय म्हणून सांगतो. चांगल्या विचारांना पाठिंबा मिळत नाही, त्याची उपेक्षाही झालेली आहे. कार्ल मार्क्सचा मृत्यू झाला तेव्हा स्मशानामध्ये त्याला निरोप देण्यासाठी खच्चून अकरा माणसं होती पण आज कार्ल मार्क्सच्या विचारांनी, शास्त्रीय समाजवादाच्या विचारांनी माझ्या कल्पनेने असं कुठलं राष्ट्र, रंग राहिलेलं नाही, ज्याच्यावर याच्या विचारांचा प्रभाव पडलेला नाही. तेव्हा कार्ल मार्क्सच्या अंत्यविधीला किती माणसं होती याची मातब्बरी आपल्याला मानण्याचं कारण काय? तेव्हा मला असं वाटतं, आजच्या या परिस्थितीमध्ये आपणाला जावं लागेल. ज्यांनी धैर्यानं याला तोंड दिलंय त्यांना यश आलंय. १९२७ साली महाडला डॉ. आंबेडकरांनी चवदार तळ्यामध्ये उतरून ओंजळभर पाणी पिण्याचा सत्याग्रह केला. डॉ. बाबासाहेबांच्या बरोबरच्या सहकाऱ्यांवर सवर्ण हिंदूंनी लाठ्याकाठ्यांनी मारहाण केली. १९२७ ची घटना आहे. १९२० साली राजर्षी शाहूमहाजांनी कोल्हापूरला त्यांना फेटा बांधून (मानाचा) आपल्या राजमहालात नेलेले आहे. १९२४ साली कर्मवीर भाऊराव पाटलांनी सातारा शहरामध्ये महाडपासून १०० कि. मी. अंतारावर अठरापगड जातींच्या मुलांचं वसतीगृह चालवलं. ज्या सातारा शहरामध्ये १९०४ साली डॉ. आंबेडकरांना हायस्कूलमध्ये संस्कृत विषय घेता आला नाही म्हणून पार्शियन अभ्यास करावा लागला, त्या सातारा शहरामध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांनी एक भिंगारदेव नावाचा मांगाचा मुलगा त्याला संस्कृत विषयामध्ये त्या शाळेत त्याने पहिला नंबर आणून दाखवला. त्याचा सत्कार १९२७ साली आमच्या महात्मा गांधींनी केला. महात्मा गांधींनी त्याच्या गळ्यात हार घातला, का तर एक मांगाचा मुलगा सातारा शहरामध्ये उच्चवर्णीयांची मुलं जिथं शिकतात तिथे संस्कृत विषयात पहिला नंबर मिळवतो. दुसरा मुलगा ए.बी.शेख नावाचा. दोघांनाही ९८ टक्के माझा दावा इथचं आहे, हे काम अवघड आहे. सोपं नाही पण अवघड काम असलं तरीदेखील केल्याशिवाय पर्याय नाही यासारखं असायला हवं. आपल्याला कुठतरी करावं लागेल, एक म्हण आहे की कितीही दीर्घ मुदतीची, दीर्घ लांबीची सफर घेतलीत तरी ती पहिलं पाऊल टाकूनच सुरू होत असते. तर पहिलं पाऊल टाकूया. धर्मनिरपेक्षता, बंधुभाव आणि विशेषत: सामाजिक समतेचा आग्रह धरणं, याचा विचार करूया आणि सामाजिक समतेच्या आग्रहाबरोबर एक गोष्ट आजच्या निमित्ताने मला प्रकर्षाने नजरेला आणायचीय, की ५२ वर्षांच्या स्वराज्यानंतर का असेना, या देशामधल्या ज्या लोकांना आम्ही शिक्षणापासून वंचित ठेवलंय त्याच्या शिक्षणाची चर्चा करूया, बालमजूर प्रथा बंद कशी पडेल याच्यासाठी काहीतरी प्रयत्न करूया, आज आपण बालमजूर प्रथेला काहीतरी संरक्षण देतोय. काही माणसं बोलतात "कशात काय, ते पोरगं हॉटेलमध्ये कपबश्या धुतंय दहा रुपये मिळवतं, कुणाची तरी गुरं राखतं." मी असं म्हणतो, "तुझ्याही पोराला घाल की रे, तुझ्याही पोराला दहा रुपये मिळतील. ते नाही ना तुझ्या मुलाच्या हिताचं मग त्याच्या हिताचं कसं असेल?"

आज ज्या विभागाला आपण सामाजिक न्याय नाकारलाय,

तो सामाजिक न्याय तुम्हाला त्यांना द्यावा लागेल. डॉ. आंबेडकरांनी त्यावेळी घटनेचा समारोप करतांना, २५ नोव्हेंबरचं त्यांचं भाषण आहे १९४९ सालचं. त्यावेळी त्यांनी सांगितलं की, उद्याच्या जानेवारी १९५० पासून आपण नव्या पण एका अंतर्विरोधाच्या क्षेत्रात प्रवेश करत आहोत. हा अंतर्विरोध काय आहे तर सामाजिक क्षेत्रामध्ये विषमता, आर्थिक क्षेत्रामध्ये विषमता पण राजकीय क्षेत्रामध्ये समता आलेली असेल, फार काळ हे चालणार नाही. सामाजिक, आर्थिक विषमता आणि राजकीय क्षेत्रामध्ये समता याला अर्थ काय? त्यांनी सांगितलं, की हा अंतर्विरोध लवकर दुरुस्त करावा लागेल तर हा केला नाहीत तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्राच्या चापाखाली किंकाळ्या (विषमतेच्या) फोडणारे वर्ग जे असतील, ते तुम्ही महतप्रयासाने उभा केलेला राजकीय लोकशाहीचा डोलारा कोसळून पाडतील आणि म्हणून मी मघाशी म्हणालो की, "आपल्याला याची जाणीव झाली पाहिजे. ज्या बीडच्या ऊस तोडणाऱ्या शेतमजुरांचा मी उल्लेख केला. सात लाख शेतमजूर येतात. बायको, मुलं सगळी गाडी घेऊन येतात. सहा महिने ते मूल शाळेपासून बाजूला रहातं त्याची शाळा बुडते. ते गळतं आणि मूल निरक्षर बनतं हे रहाटगाडगं चालू आहे. मी त्यांच्या एका परिषदेमध्ये बोलताना गमतीने म्हणालो, "बाबांनो तुमचे आमचे ऋणानुबंध फार घट्ट आहेत. तुमच्याशिवाय आम्ही ऊस तोडण्याचं काम कुणालाही देत नाही. आमच्याकडे किरकोळ फौजदाराची, मामलेदाराची नोकरी निघाली तर आम्ही तुम्हाला एवढ्या लांब यायचा त्रास देत नाही, ते काम आमचं आम्ही भागवून घेतो, आमची माणसं आहेत त्यासाठी. पण ऊस तोडायचं काम तुमच्याशिवाय आम्ही कुणाला देणार नाही, फक्त चिंता एवढीच तुमचं वय झालं, तुमचा हात चालत नाही, तुमचा विळा चालत नाही, तर माझा ऊस कोण तोडणार? तर त्याचाही आम्ही बंदोबस्त केलाय. तुम्ही जसे निरक्षर होता म्हणून माझा ऊस तोडायला आलात तसा तुमचा मुलगाही तुमच्या पाठोपाठ निरक्षर बनावा आणि माझा ऊस तोडायला तो निरंतर यावा." तुम्ही माझा ऊस तोडलात, माझ्या मुलाचाही ऊस तोडायला तुमचा मुलगा यावा; एवढा बंदोबस्त आम्ही केलेला आहे. मित्रांनो हे चांगलं नाही. आपण सुसंस्कृत नाही याचा हा पुरावा आहे म्हणून ही जी मंडळी (पुरस्कार विजेती) आहेत ती उपेक्षितांच्या क्षेत्रात काम करताहेत. जी सक्षम आहेत त्यांच्यासाठी काम करण्याची गरज नाही. जे उपेक्षित आहेत त्यांच्यासाठीच काम करायचंय, हे काम करण्यासाठी माणसं कमी पडतील पण ती माणसं जर निष्ठेची असतील तर मला नाही वाटत, की हे काम अडून राहील आणि हे काम करण्याची गरज आहे. पं. नेहरूंच्या एकाच गोष्टीचा उल्लेख करतो. पं. नेहरूंच्या टेबलावर एका कवीच्या चार ओळी असायच्या,'रॉबर्ट फ्रॉस्ट'. त्याच्या त्या चार ओळी होत्या. त्याचा अर्थ असा होता...

*'वृक्षराजी ही वनराजी गर्द आहे, शीतल आहे. इथून बाहेर पाऊल टाकवत नाही. इथंच बसावंस वाटतं, इतकी ती गर्द आणि शीतल आहे, परंतु मला काही आश्वासनं पाळायचीत, मला मैलोगणती वाटचाल करायचीय. मला मुक्काम करता येत नाही. आपल्याला मैलोगणती चालायचंय.*

या रॉबर्ट फ्रॉस्टच्या चार ओळी पं. नेहरूंना मोहिनी घालणाऱ्या होत्या. या ओळींच्या प्रभावामध्ये मी फारसा नाही पण दुसऱ्याच दोन ओळी मला जास्त मोहिनी घालतात. त्याचा अर्थ असा...

*वनराजीतून दोन रस्ते बाहेर पडले (दोन वाटा). एक मळलेली आणि दुसरी न मळलेली, कमी मळलेली. मी कमी मळलेली वाट स्वीकारली आणि त्याच्यामधून हे सारं घडलं.*

ही जी सारी माणसं आहेत ती कमी मळलेल्या वाटेवरून चाललेली आहेत आणि तुम्ही-आम्ही मळलेल्या वाटेने जातोय. काटा नाही, कुटा नाही, खड्डा नाही, पाय मुरगळण्याची भिती नाही, काही नाही. त्यांचे पाय रक्तबंबाळ झालेले आहेत, त्यांच्या पायात काटेकुटे गेलेले आहेत. मोहनभाईच्या पायात काटेकुटे गेलेले आहेत पण ते त्यांनी बघितलेले नाहीत. आमच्या कर्णिकताईंच्या पायात काटेकुटे गेलेले आहेत पण त्या काट्याकुट्यांची त्यांनी पर्वा केली नाही कारण ती वाट काट्याकुट्यांची असेल, रक्तबंबाळ करणारी असेल पण त्याच वाटेने तुम्हाला जिथं जायचं आहे तिथे जाता येतं आणि ही मळलेली वाट तुम्हाला जिथं जायचं आहे तिथे नेईलच असं नाही. ती वाट जिकडे जाते तिकडे तुम्ही जाता. तेव्हा आपण जरा फार शहाणे आहोत. मळलेल्या वाटेनं जाण्याचं शहाणपण करतोय आणि न मळलेल्या वाटेवरून जाणाऱ्याला हसतोय. तर आता जरा कमी हसूया आणि आपणही जरा कमी मळलेल्या वाटने जाण्याचा प्रयत्न करून काय काय घडतं ते पाहूया.

शब्दांकन : **नंदिनी चाळके**

❑❑

# उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांना सावरणारी, महिला अत्याचाराला सामोरी जाऊन आपद्ग्रस्त, निराधार स्त्रियांना आर्थिक आधार देणारी, निवारा देणारी नाशिकची

# महिला हक्क संरक्षण समिती

■ सौ. रूपाली देशमुख

समाजात महिलांवर होणारे अत्याचार, मन विषण्ण करणाऱ्या हुंडाबळीसारख्या घटना, परित्यक्ता होणाऱ्या दुर्दैवी स्त्रियांची दु:खे आणि व्यसनाधीन झालेल्या नवऱ्यांकडून मार खाणाऱ्या बायका हे सारे वाढत्या प्रमाणात होत असल्याचे पाहून नाशिक शहरातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्रीमती कुसुमताई पटवर्धन यांनी या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी असणाऱ्या निवडक महिलांना बरोबर घेऊन १८ ऑगस्ट १९८२ रोजी 'महिला हक्क संरक्षण समिती'ची स्थापना केली. आजही वर निवेदिलेल्या बाबी समाजाच्या दृष्टीने चिंताजनक ठरतील एवढ्या मोठ्या प्रमाणात घडत आहेत. 'महिला हक्क संरक्षण समिती'मार्फत त्यांच्या निराकरणाबरोबरच उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांना सावरण्याचे, योग्य सल्ला देण्याचे, घरातील बाईमाणसांची बूज राखण्याचे काम केले जात आहे. परित्यक्तांना आधार देऊन त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करण्याचे तसेच सामाजिकदृष्ट्या संक्रमण काळातील अशा स्त्रियांना अल्पावधीसाठी निवासाची सोय समितीतर्फे केली जाते. अशा गरजू महिलांना कायदेशीर मदत उपलब्ध केली जाते.



'स्त्रियांचे प्रश्न' या क्षेत्रातील कार्याबद्दल संस्थेसाठी असलेला
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार
**महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक**
श्रीमती साधना तोरणे

समाजातील स्त्रियांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन त्यांचा सामाजिक दर्जा वाढविण्याचे, कर्तव्याची जाणीव करून देण्याचे, त्यांना कायदेशीर हक्काची, कायद्यांच्या तरतुदींची माहिती करून देण्याचे कार्य समितीतर्फे केले जाते.

## कौटुंबिक वादात सल्ला-समझोता

गेल्या दीड तपांहून अधिक काळ हे कार्य अखंडपणे चालू आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची नोंद घेण्यासाठी समितीचे कार्यालय १२ ते ५ पर्यंत दररोज खुले असते. कौटुंबिक वादात, नवरा-बायकोंच्या भांडणात योग्य सल्ला देऊन समझोता करण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा प्रकरणांवर समितीचे कार्यकर्ते अधिक लक्ष ठेवतात. मधून मधून समझोत्यानुसार रीतसर कार्यवाही चालली आहे किंवा नाही हे घरी जाऊन पाहणी करतात.

स्त्री मुक्तीच्या आणि स्त्रियांच्या समस्यांबाबत प्रबोधन व्हावे, समाजात जाणीवजागृती निर्माण व्हावी म्हणून समितीतर्फे शिबिरे, जागृती यात्रा, पथनाट्य, सभा, प्रदर्शने, सेमिनार, चर्चासत्रे, वृत्तपत्र लेखन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात.

शासनस्तरावर नाशिक जिल्हा व महानगर क्षेत्रासाठी 'पोलीस महिला सामाजिक सुरक्षा समिती' स्थापन झाली आहे. त्यात समितीच्या अध्यक्षांसह ४-५ महिला कार्यकर्त्या सभासद आहेत. दरमहा या सभा होतात. स्त्रियांना मारहाण, कोंडून ठेवणे, घराबाहेर काढणे, मुलांचा ताबा इत्यादी प्रकरणे पोलीस अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून पोलिसांच्या सहकार्याने सोडविली जातात. प्रतिवर्षी सुमारे ४५० ते ५०० केसेस समितीत नोंदविल्या जातात.

समितीत ५-६ महिला वकील काम करतात. त्यामुळे नाशिक, नाशिकरोड, निफाड इत्यादी न्यायालयात समितीतर्फे स्त्रियांचे दावे चालविण्यात येतात. उच्च न्यायालयातही वेळ पडल्यास दावे समितीतर्फे चालविले जातात.

## विविध कामांचे स्वरूप

१९९९-२००० वर्षात समितीने युवती मेळावा घेऊन युवतींना एड्स या विषयावर मार्गदर्शन केले तर एका महिला मेळाव्यात 'रेशनिंग कार्ड व त्याचे फायदे' या विषयावर विवेचन करण्यात आले. अंगणवाडी कार्यकर्त्यांचे शिबिर आदिवासी भागांत आयोजित करण्यात आले. किशोरी शिबिराचे गाजरवाडी येथे आयोजन करून ५० मुलींना आरोग्य व स्वच्छता, मासिक पाळी, शारीरिक बदल या विषयी माहिती देण्यात आली.

सोनांबे व चेहडी येथे २ महिन्यांचे शिवण शिबिर चालविण्यात









'स्त्रियांचे प्रश्न' या क्षेत्रातील कार्याबद्दल संस्थेसाठी असलेला
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार
**महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक**
श्रीमती साधना तोरणे

समाजातील स्त्रियांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन त्यांचा सामाजिक दर्जा वाढविण्याचे, कर्तव्याची जाणीव करून देण्याचे, त्यांना कायदेशीर हक्काची, कायद्यांच्या तरतुदींची माहिती करून देण्याचे कार्य समितीतर्फे केले जाते.

## कौटुंबिक वादात सल्ला-समझोता

गेल्या दीड तपांहून अधिक काळ हे कार्य अखंडपणे चालू आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची नोंद घेण्यासाठी समितीचे कार्यालय १२ ते ५ पर्यंत दररोज खुले असते. कौटुंबिक वादात, नवरा-बायकोंच्या भांडणात योग्य सल्ला देऊन समझोता करण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा प्रकरणांवर समितीचे कार्यकर्ते अधिक लक्ष ठेवतात. मधून मधून समझोत्यानुसार रीतसर कार्यवाही चालली आहे किंवा नाही हे घरी जाऊन पाहणी करतात.

स्त्री मुक्तीच्या आणि स्त्रियांच्या समस्यांबाबत प्रबोधन व्हावे, समाजात जाणीवजागृती निर्माण व्हावी म्हणून समितीतर्फे शिबिरे, जागृती यात्रा, पथनाट्य, सभा, प्रदर्शने, सेमिनार, चर्चासत्रे, वृत्तपत्र लेखन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात.

शासनस्तरावर नाशिक जिल्हा व महानगर क्षेत्रासाठी 'पोलीस महिला सामाजिक सुरक्षा समिती' स्थापन झाली आहे. त्यात समितीच्या अध्यक्षांसह ४-५ महिला कार्यकर्त्या सभासद आहेत. दरमहा या सभा होतात. स्त्रियांना मारहाण, कोंडून ठेवणे, घराबाहेर काढणे, मुलांचा ताबा इत्यादी प्रकरणे पोलीस अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून पोलिसांच्या सहकार्याने सोडविली जातात. प्रतिवर्षी सुमारे ४५० ते ५०० केसेस समितीत नोंदविल्या जातात.

समितीत ५-६ महिला वकील काम करतात. त्यामुळे नाशिक, नाशिकरोड, निफाड इत्यादी न्यायालयात समितीतर्फे स्त्रियांचे दावे चालविण्यात येतात. उच्च न्यायालयातही वेळ पडल्यास दावे समितीतर्फे चालविले जातात.

## विविध कामांचे स्वरूप

१९९९-२००० वर्षात समितीने युवती मेळावा घेऊन युवतींना एड्स या विषयावर मार्गदर्शन केले तर एका महिला मेळाव्यात 'रेशनिंग कार्ड व त्याचे फायदे' या विषयावर विवेचन करण्यात आले. अंगणवाडी कार्यकर्त्यांचे शिबिर आदिवासी भागांत आयोजित करण्यात आले. किशोरी शिबिराचे गाजरवाडी येथे आयोजन करून ५० मुलींना आरोग्य व स्वच्छता, मासिक पाळी, शारीरिक बदल या विषयी माहिती देण्यात आली.

सोनांबे व चेहडी येथे २ महिन्यांचे शिवण शिबिर चालविण्यात

















आले. त्यांत २२ मुलींना लाभ देण्यात आला.

बाल आनंद मेळावा, बाल मजूर मेळावा, आरोग्य शिबिर, व्यक्तिमत्त्व विकास शिबिर, स्त्री मुक्ती चळवळीच्या कार्याची दिशा यांचे मार्गदर्शन प्रमिलाताई दंडवते, सुधाताई वर्दे, शैला लोहिया यांनी केले तर डॉ. अभय बंग यांनी 'ग्रामीण भागातील मुलांचे कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण' या विषयावर दोन स्वतंत्र मेळाव्यात मार्गदर्शन केले. डॉ. राणी बंग यांच्या उपस्थितीत युवतींसाठी खास तीन दिवसांचे आरोग्य शिबिर योजण्यात आले. त्यात वयात येणे, शारीरिक बदल, स्त्री-पुरुष जननेंद्रिय, गरोदरपण, गर्भाची वाढ, बाळंतपण, वंधत्व, मासिक पाळी, वैवाहिक जीवन, नातेसंबंध या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी प्रबोधन शिबिर घेण्यात आले.

नव्याने झोपडपट्टीतील वस्तीत काम कोणते व कसे सुरू करावे या दृष्टीने झोपडपट्टीतील गरजांवर आधारित सभा समितीने आयोजित केली होती. स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा केला. स्त्री-पुरुष समानता शिबिर, उद्योजकता विकास, स्त्री मुक्ती शासकीय योजनांच्या माहितीचे शिबीर, आरोग्य तपासणी आदी शिबिरे, महिला मेळावे दरवर्षाप्रमाणे या वर्षी योजण्यात आले. त्यांना अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. हे सर्व मेळावे, शिबिरे शहराच्या बाहेर ग्रामीण, आदिवासी दुर्गम भागात आयोजित करण्यात आली होती.

## कल्याणी प्रकल्प

आपद्‌ग्रस्त महिलांची तात्पुरती रोजगाराची व्यवस्था करण्यासाठी समितीने 'कल्याणी प्रकल्प' हाती घेतला आहे. त्यासाठी नाशिकजवळ सिडको क्षेत्रात तीन मजली इमारत बांधली असून सातपूर, अंबड येथील औद्योगिक वसाहतीतील लहान-मोठ्या उद्योग समूहांची, कंपन्यांची विविध कामे केली जातात. खडू तयार करून शाळांना पुरविले जातात. या उद्योगकेंद्रात काम करणाऱ्या विधवा, परित्यक्ता, अल्प उत्पन्न गटातील महिला व त्यांची मुले यांना वैद्यकीय व शैक्षणिक मदत आणि लहान मुलांसाठी पाळणाघर चालविले जाते. आजपर्यंत सुमारे ७० महिलांना काम मिळवून दिलेले आहे.

## कुटुंब सल्ला केंद्र

शासनाच्या महिला व बाल कल्याण कार्यालयामार्फत अनुदान तत्त्वावर 'बहुउद्देशिय महिला केंद्र' समितीतर्फे चालविण्यात येते. महिलांना शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व प्रशिक्षण या केंद्रातर्फे दिले जाते. या खेरीज महिलांच्या

समस्या सोडविण्यासाठी सुलभता यावी म्हणून ओझर, पंचवटी, सिडको, कथडा, नाशिकरोड, मालेगाव, सटाणा येथे उपकेंद्रे कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार बोर्डातर्फे 'कुटुंब सल्ला केंद्र' समितीमार्फत चालविण्यात येते. केंद्रातर्फे किशोरी शिबिरे आयोजित केली जातात.

समितीतर्फे ३२ अल्पबचत महिला गट आहेत. प्रेरणा, संघमित्रा, आम्रपाली, मानसी अशी गटांची नावे आहेत. प्रत्येक गटात सरासरी १५ ते २० महिला सभासद आहेत. त्या दरमहा १०० ते २५ या प्रमाणे बचत करतात. त्यातून गरजूंना कर्ज वाटप केले जाते. घरगुती खर्च, मुलांचे आजार, साधनसामुग्री इत्यादींसाठी सव्वा लाखापर्यंत कर्जाचे वाटप केले आहे. 'मानसी' या बचत गटाने शिकेकाई पावडरचा उद्योग या बचत गटातून केला आहे. अनेक महिलांनी स्वत:ची छोटी छोटी दुकानेही काढली आहेत. स्वयंरोजगारांचे तत्त्व अशा तऱ्हेने बचत गटाच्या योजनेतून राबविण्यात समितीला चांगले यश आले आहे.

## आंदोलनात्मक कार्य

मुस्लिम महिलांच्या प्रश्नाबाबत समिती विशेष कार्य करते. मुस्लिम महिलांसाठी एक खास कक्ष समितीत आहे. मुस्लिम वस्तीत कथडा व बागवनपुरा उपकेंद्र उघडण्यात आली आहेत.

समितीतर्फे तलाकपीडित मुस्लिम महिला मुक्ती मोर्चा १९८७ साली काढण्यात आला होता. १९९६ साली मुस्लिम महिलांच्या दृष्टीने विशेष जिव्हाळ्याच्या 'तलाक' या विषयावर नाशिक येथे एक परिसंवाद घेण्यात आला. त्यात रजिया पटेल, राजर अन्वर, मेहरून्नीसा दलवाई, हुसेन जमादार इत्यादी मुस्लिम कार्यकर्त्यांना खास निमंत्रण देण्यात आले होते. मुस्लिम कायद्याबाबत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात आले.

औरंगाबाद येथे १९९४ साली झालेल्या राज्यव्यापी परित्यक्त्या परिषदेसाठी नाशिकच्या असंख्य परित्यक्त्या भगिनींना नेऊन प्रत्यक्ष सहभागही घेतला. स्त्री-पुरुष समानता अभियान शिखर शिंगणापूर येथे २० जून २००० रोजी झालेल्या राज्यव्यापी सत्याग्रहात समितीच्या अध्यक्षा साधना तोरणे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्या सामील झाल्या होत्या.

## समितीचा पुरस्कार

समितीच्या वतीने ८ मार्च रोजी महिला दिनी सामाजिक, शिक्षण, सहकार क्षेत्रात, जिल्ह्यात किमान दहा वर्षं सातत्याने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलेला 'सावित्रीबाई फुले' यांच्या नावाने पुरस्कारही दिला जातो. निराधार, निराश्रित स्त्रियांना अनेक छोट्या उद्योगांतर्फे उद्योग केंद्राची स्थापना करून, पुनर्वसन करून आर्थिक आधार देण्यासाठी प्रशिक्षण व अनौपचारिक शाळेच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने समितीला कमाल नागरी जमिनीतील ९२४ चौ. मीटर क्षेत्राची जागा मखमलाबाद शिवारात देऊन समितीच्या कार्याचा एक प्रकारे गौरव केला आहे. याच दृष्टीने आगामी कार्याची रूपरेषाही आखण्यात आली आहे.

## मिळालेले विविध पुरस्कार

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे उत्तर महाराष्ट्र विभागस्तरावर उत्कृष्ट संस्था म्हणून समितीला १९९६-९७ चा 'अहिल्याबाई होळकर' पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार पंचवीस हजार रु. रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र या स्वरूपात राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आला.

'सौ. कुसुमताई मधुकरराव चौधरी महिला कल्याणी प्रतिष्ठान'तर्फे उत्कृष्ट संस्था म्हणून समितीला पंधरा हजार रु. रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र या स्वरूपात अभिनेत्री सुलोचना यांच्या हस्ते २६ जून १९९७ रोजी मुंबई येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आणि आता अमेरिकेतील महाराष्ट्र फाउण्डेशनने उत्कृष्ट संस्था म्हणून 'समाजकार्य गौरव पुरस्कार' — तीन लाखाचा पुरस्कार, सन्मानचिन्ह — देण्याचे फाउण्डेशनच्या वतीने मा. मृणालताई गोरे यांनी नुकतेच जाहीर केले आहे.


स्त्री मानसिकदृष्ट्या मुक्त होण्यासाठी, स्त्री स्वावलंबी व स्वाभिमानी होण्यासाठी, आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याकरिता, स्त्री-पुरुष समानता यावी यासाठी समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य समितीतर्फे सातत्याने अठरा वर्षांपासून चालू आहे. समाजाच्या सक्रिय सहकार्याने यापुढेही सातत्यपूर्ण विविध उपक्रम राबवून कार्यरत राहण्याचे धोरण समितीने अंगीकारले आहे.

❑❑

मनोहर कदमच्या मृत्यूचा सर्वांनाच चटका लागून राहिला. त्याला मृत्यूने अवेळी गाठलं. याची तर खूप रुखरुख लोकांना लागली. अठ्ठेचाळीस वर्षाचं वय हे काही मृत्यूचं वय नाही. मृत्यूला वयोमर्यादेचं कुठलंही बंधन नसलं, तरीही परिपूर्ण आयुष्य जगण्याची आपली जी कल्पना आहे, त्याच्या अर्ध्यावरच मनोहर गेला. खरं तर हे वय एका परिपक्वतेकडं झुकत जाणारं असतं. सर्वच पातळ्यांवरचे अनुभव गाठीशी असतात. माणसं पाहिलेली असतात. अनुभवलेली असतात. त्यांचं बरंवाईटपण, त्यांचं वागणं याचा अर्थ लागत चाललेला असतो. मुखवटा आणि चेहरा यातला चीड आणणारा फरक कळू लागलेला असतो. या वयात मनोहरने जाणं म्हणजे सारंच अर्ध्यात सोडून जाण्यासारखं वाटतं. माणसाच्या वृत्तीला आणि प्रतिभेला जो बहर येतो, बांधिलकीचा जो आकार स्पष्ट होतो किंवा विचार आणि कृती यांची तन्मयता जी सिद्ध होते ती वयाच्या याच टप्प्याच्या आसपास. या साऱ्या गोष्टींची पूर्तता करुन मनोहर कदम गेला. गेले काही दिवस एका अवघड व्याधीने त्याला ग्रासलं होतं. त्याला, त्याच्या कुटुंबियांना नि त्याला ओळखणाऱ्या त्याच्या मित्रांना या गोष्टीची कल्पना होती. त्यांच्या आवाक्यात असलेली उपायांची सारी शर्थ त्यांनी केली. या दुखण्यावर मात करून मनोहर उभा राहील असं वाटत होतं. पण तसं घडू शकलं नाही. त्याला टाटा हॉस्पिटलमधून हलवल्यानंतर व्याधीची अखेर सर्वांच्या लक्षात आली होती. तरीही, त्याचा तीळ तीळ तुटत चाललेला देह ही एक बाजी जिंकेल, किमान जिंकावं असं सर्वांनाच वाटत होतं. पण घडलं विपरीतच. सर्वांना चटका लावून मनोहर कदम गेला.

# मनोहर कदम

■ अविनाश महातेकर



'समाज प्रबोधना'च्या क्षेत्रातील कार्याबद्दल व्यक्तीसाठी असलेला
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार
**मनोहर कदम**

त्याच्या मृत्यूचं वास्तव त्याची पत्नी आणि मुलगा यांनी ज्या धाडसाने स्वीकारलं ते तर आणखीनच विलक्षण आहे. त्याही शोकाकूल परिस्थितीत त्यांनी मनोहरच्या मरणोत्तर नेत्रदानाचा निर्णय घेतला अन् अंमलात आणला. आधी कुठल्याही प्रकारची तांत्रिक तजवीज झालेली नव्हती. ऐनवेळी डॉक्टरांनी कुटुंबियांच्या इच्छेचा सन्मान केला. मनोहरच्या जगण्याला आणि जगण्याच्या अंताला त्याच्या कुटुंबियांनीही खूप मोठं केलं. शोक आणि भावना यातून सारासार निर्णय करायला खूप मोठी शक्ती लागते. मनाचा समर्थपणा लागतो. तो मनोहरच्या कुटुंबियांनी दाखवला. कुणा एकाला त्याच्या काळोखी आयुष्यात प्रकाश दिसला असेल हे समाधानही खूप बोलकं आहे.

कार्यकर्त्याचा मृत्यू सहन करताना खूप यातना होतात. कारण कार्यकर्त्याच्या मृत्यूबरोबर त्याचा एक कालखंड संपलेला असतो. जग कुणासाठीही थांबत नाही हे खरं आहे. जगाचे व्यवहार नित्यनेमाने सुरुच असतात. पण या नित्यनेमावर एक ओरखडा ओढायची ताकद कार्यकर्त्याच्या मृत्यूमध्ये असते. कार्यकर्त्याने एक ध्यास जगलेला असतो; एक विचार जगलेला असतो; आयुष्याची जी नैतिक भूमिका त्याने स्वीकारलेली असते, ती जगलेला असतो. या सगळ्यांचा त्याच्याबरोबरच अंत होतो. कार्यकर्ता स्वत: एक संस्था असतो, एक संघटना असतो. या सगळ्यांच्या अंत त्याच्याबरोबर होतो. पुन्हा, नवी विटी नवा खेळ या न्यायाने लोक उभे राहतात. पण कार्यकर्त्याने उभा केलेला पसारा आणि खेळ त्याच्याबरोबरच संपतो. मनोहरने त्याच्या वैचारिक भूमिकेचा खूप मोठा आवाका उभा केला होता. स्वत:ला तात्त्विक भूमिकेवर जगवताना कित्येक जण डळमळीत होतात. मनोहर अजिबात परवड होऊ न देता त्याची तात्त्विक भूमिका जगला. मन लावून जगला!

प्रतिमा जोशी सांगत होत्या की मृत्यूपूर्वी पंधरा-वीस मिनिटं आधी मनोहर चांगला बोलत होता. त्याला नामांतराच्या



लढ्यातलं गाणं ऐकावंसं वाटत होतं. 'चळवळीतलं गाणं गा' असं तो कुणाला तरी बोलतदेखील होता. त्या आठवणींनी भरून येत सांगत होत्या. ऐकताना माझ्या मनात खळबळ उडाली. चळवळींमध्ये एवढा जीव गुंतवून माणसं जगतात कशी कळत नाही. या माणसांची मूसच वेगळी असते. मृत्यू काही मिनिटांच्या अंतरावर असताना सामान्यपणे लोकांना त्यांची जिवाभावाची माणसं आठवतात किंवा आणखी काहीही. पण ज्यांचा जीव हाच एक चळवळ असते ते देह त्यागतानाही त्याचा प्रत्यय देतात. एका विराट अर्थाचा प्रत्यय देतात. मनोहरने नकळत तो प्रत्यय दिला. मला माहिताय, शाहीर विलास घोगरेचं 'जळतोय मराठवाडा' हे गाणं आपल्या बुलंद आवाजात नि केस उडवत जेव्हा संभाजी भगत गायला होता तेव्हा मनोहर तन्मय होऊन गाणं ऐकत होता. त्याची आनंदाची लहर व्यक्त करण्याची पद्धतही खूप सीमित प्रकारची होती. समाधानाच्या काही छटा त्याच्या चेहऱ्यावर तरळायच्या आणि अजून आपण रणांगण सोडलं नाही हा दिलासा सहकाऱ्यांना द्यायच्या. प्रतिमा जोशी सांगत असताना मला सारखं वाटत होतं की त्याची आंबेडकरी चळवळीशी असलेली बांधिलकी आम्ही समजून कशी घेतली नाही!

मनोहर कदम हा नामांतराच्या लढ्यात होता. त्याने सत्याग्रहदेखील केला होता. नित्याकरता तुरुंगवासही भोगला होता. नामांतराच्या लढ्याचे खूप पैलू आहेत. त्यातला महत्त्वाचा एक पैलू असाही होता की या लढ्यात आंबेडकरवादी संघटनांबरोबर जवळ जवळ साऱ्याच परिवर्तनवादी व्यक्ती आणि संघटना उतरल्या होत्या. आंबेडकरवादी तरुण जास्त आग्रही आणि आक्रमक होते. पण त्यातला संघर्ष विशिष्ट भूमिकेवरचा होता. हा संघर्ष परिवर्तनवादी सर्वच समूहांना भावत होता. आकर्षित करत होता. याच भावनेतून मनोहरसारखा कार्यकर्ता या लढ्यातही उतरला होता. सक्रीय झाला होता. नामांतर लढा हा सर्व परिवर्तनवादी समूहांना आंबेडकरी शक्तीच्या जवळ आणणारा लढा होता. या घटनेला व्यापक अर्थ देता आला नाही हा भाग अलाहिदा! पण या लढ्याच्या निमित्ताने या शक्तीच्या ध्रुवीकरणाचा परिणाम दिसून आला. असंख्य कार्यकर्त्यांसारखाच मनोहर कदम अगदी ठरवून या लढ्यात सक्रीय झाला होता.

नामांतरासारखेच असे अनेक प्रश्न होते ज्यावर राजकीय पक्ष संघटनांच्या व्यतिरिक्तही चळवळीतले कार्यकर्ते लहानमोठे संघर्ष उभे करत होते. मुंबईतल्या गिरणी कामगारांचा प्रश्न हा त्यापैकीच एक. वास्तविक हा प्रश्न राजकीय निर्णयाच्या स्वरुपाचा झालेला आहे. पण मधल्या काळात राजकीय






पक्ष आणि प्रस्थापित कामगार संघटना यांच्या पलीकडे जाऊन काही तळमळीच्या कार्यकर्त्यांनी या प्रश्नावर जनमत संघटित करण्याचा प्रयत्न केला. किमान कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. जे प्रत्यक्ष काम करत होते त्यांना अनेक कार्यकर्ते मदत करत होते. मनोहर कदम त्यापैकी एक होता.

मनोहरने सलग तीन-साडेतीन वर्ष 'महानगर'मधून स्तंभलेखन केलं. सातत्याने लिहिलं. वेळोवेळी जे प्रश्न उभे राहिले त्यावर अभ्यासपूर्ण मतं मांडली. एखादा लेख किंवा पुस्तक लिहिणं वेगळं नि वृत्तपत्राची डेडलाईन सांभाळून सातत्याने लिहिणं ही वेगळी गोष्ट होती. त्याचं लेखन सकस होत होतं, शैलीच्या फार प्रेमात न पडता, पण धारदारपणे तो लिहित होता. चळवळीत काठावर उभं राहून चळवळीतल्या प्रश्नांवर लिहितात त्यांचं लेखन कळतं. ते कोरडं आणि सिद्धांतवजा असतं. तिथे लेखकाने एक 'पोज' घेतलेली असते. बहुधा मार्गदर्शकाची. पण मनोहरच्या लेखनात तो कोरडेपणा नव्हता. ओलावा होता. वैचारिक भूमिकेचा ध्यास होता. स्तंभलेखकांना एक भीती असते. त्यांना ते 'समाजसुधारक' झाल्याची बाधा होण्याची शक्यता असते. मनोहर या बाधेपासून खूप दूर होता. कारण तो सकारात्मक भूमिका घेऊन परिस्थितीचं विश्लेषण करत असे. जास्तीत जास्त माहिती मिळवून त्याआधारे विधानं करत असे. त्याने मनूच्या पुतळ्याबद्दल लिहिलं तेव्हा त्यातल्या कितीतरी कायदेशीर बाबींची त्याने माहिती दिली होती.

मनोहर कदमने लेखन-स्वरुपातलं केलेलं मोठं काम म्हणजे कामगार-नेते-नारायण मेघाजी लोखंडे यांच्या चरित्राचं लेखन. त्याच्या या एकाच कृतीला बारा पारितोषिकं मिळाली. ते एक बरं झालं. अशी विलक्षण कृती उपेक्षित राहिली असती तर लोखंडे उपेक्षित राहिले त्यापेक्षा अधिक दुःख झालं असतं. या एकाच पुस्तकाने मनोहरला लेखक म्हणून जी प्रतिष्ठा मिळवून दिली, त्यापेक्षा जास्त, एक अभ्यासू संशोधक म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली, नारायण मेघाजी लोखंडे यांचं चरित्र हे केवळ एका व्यक्तीचं आत्मवृत्त नाहीये, तर कामगार चळवळीच्या आद्यपरिस्थितीची माहिती देणारा दस्तऐवज आहे. 'लोखंडे यांना वर्गीय चळवळीची माहिती नव्हती,' अशा प्रकारचा समज कामगार चळवळीच्या इतिहासात पसरवला गेला होता. त्यामुळे शास्त्रशुद्ध वर्गीय चळवळ म्हणून कामगार चळवळीकडे बघताना नारायण मेघाजी लोखंडे यांचं कर्तृत्व दुर्लक्षित केलं जात होतं. मनोहरच्या पुस्तकामुळे नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कारकिर्दीवरचा अन्याय दूर झाला. असाच अन्याय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याही कामगार चळवळीविषयीच्या धोरणाबाबत नि मजूरमंत्री म्हणून त्यांनी घेतलेल्या भूमिकेबाबत झालेला आहे.

मनोहर कदम याचं दुसरं पुस्तकदेखील महत्त्वाचं आहे. या पुस्तकाचं वैशिष्ट्य असं की संशोधनाच्या कामात-सुद्धा जे विषय उपेक्षित राहिले, दुर्लक्षित राहिले त्या विषयावर मनोहरने मेहनत करून लिहिलंय. तेलगु समाजाचं योगदान हाही महत्त्वाचा पण उपेक्षित विषय. मुंबई, पुणे, सोलापूर इथे या समाजाचं तीन पिढ्यांचं वास्तव्य आहे. मुंबईतल्या उभारणीत तर या समाजाचं योगदान आहेच, पण फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीपासून ते डॉ. आंबेडकरांच्या चळवळीपर्यंत, सामाजिक चळवळीत त्यातले कितीतरी लोक सहभागी होते. याची माहिती नव्या पिढीला नाही. कारण काळाच्या ओघात असे कितीतरी विषय दुर्लक्षित राहिले, हे आहेच. पण साधारणपणे, थोर व्यक्तींची थोरवी सिद्ध झाली की आपण त्यांच्या सहकाऱ्यांची माहिती घेण्याचा प्रयत्न करत नाही. आणखी काही कारणांमुळेही ही गोष्ट अवघड बनते. पुढे पुढे तर साधनंसुद्धा उपलब्ध होत नाहीत. या साऱ्या अडचणी आहेत. ज्योतिराव फुल्यांच्या चळवळीत, सत्यशोधक समाजात जसे तेलगु कार्यकर्ते सामील झाले होते, तसेच मुंबईतल्या कामाठीपुऱ्यातले तेलगु कार्यकर्ते आणि पुण्यातील मोदीखान्यातले बालन्नांसारखे कार्यकर्ते डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत सामील झाले होते. अशा दुर्लक्षित विषयांचा शोध घेण्याचं साहस मनोहर दाखवत होता.




त्याच भूमिकेतून मनोहरला 'सोमवंशीय मित्रकार' शिवराम जानबा कांबळे यांचंही चरित्र लिहायचं होतं.

या सगळ्या लेखनामागची मनोहर कदमची प्रेरणाही परिवर्तनवादी चळवळीतल्या आदर्शांचा शोध घेण्याची होती. या आदर्शांना आणि त्यांनी हाताळलेल्या विषयांना नव्या पिढीतल्या कार्यकर्त्यां-समोर मांडण्याची होती. तो केवळ पोथीनिष्ठ संशोधक आहे असं मला कधीच जाणवलं नाही. सनावळ्या आणि अचंबित करणारी माहिती देणारे पुष्कळ लोक आहेत. पण चळवळीपुढे सतत आदर्श राहील, चळवळीला दिशा मिळेल, गती मिळेल अशा आदर्शकारी घटना समाजा-पुढे मांडण्याचा मनोहरचा प्रयत्न होता. कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत हिंदू-मुसलमानांचा दंगा उसळला तेव्हा 'एकोपा परिषद' घेतली होती. अशाच प्रकारची परिषद आता नव्याने दंगा उसळला तेव्हा मनोहरने घ्यायचा प्रयत्न केला होता. चळवळीचे टप्पे अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊनच त्याचं संशोधन होतं.

मनोहर कदम आणि प्रतिमा जोशी हे चळवळीतलं जोडपं. अनेक जोडपी कार्यकर्ते चळवळीत काम करतात. त्यांच्या संसाराच्या कल्पना रुढ अर्थापेक्षा वेगळ्या असतात. मनोहर आणि प्रतिमा मिळून एक संस्था चालवत होते नि त्या संस्थेमार्फत वेश्यांच्या मुलांच्या पुनर्वसनाचं काम करत होते. प्रतिमा ते काम पुढेही करत राहील यात शंका नाही. खरं तर हे खूप मोठं काम. जिकीरीचंही. पण अजिबात जाहिरातबाजी न करता उभयता हे काम करत होते. समाजातल्या एका महत्त्वाच्या प्रश्नावर जबाबदारीने काम करायची भूमिका मनोहर प्रतिमासह बजावत होता.

त्याने चौऱ्याण्णवच्या आसपास त्याची नोकरी सोडली. प्रतिमा महाराष्ट्र टाइम्समध्ये नोकरीला. शिवाय स्त्रीमुक्ती चळवळीत क्रियाशील. धाकट्या मुलाला खूप सांभाळावं लागतं. दोघं मिळून हा तणाव सोसत होते. दोघं मिळून ही परवड सहत होते. पण त्यांनी त्यांच्या कामात या गोष्टीचा अडसर होऊ दिला नाही. एवढंच नव्हे, तर दोघांच्याही लेखनात हा ताण अजिबात डोकावला नाही. सुरेखा दळवी किंवा सतीश काळसेकर म्हणाला तस्सं, एवढं तटस्थ राहून दोघंही कसं लिहू शकतात, याचंच आश्चर्य वाटतं! मनोहरला त्याचं दुखणं कळालेलं, प्रतिमालाही ते माहित झालेलं, त्यावर मात करायची दोघंही शिकस्त करत आहेत आणि तरीही तटस्थपणे आपलं चळवळीतलं चिंतनही करत आहेत. तटस्थपणे लिहीत आहेत, वागत आहेत ही गोष्ट खरोखरच वेगळ्या समष्टीवरची!

प्रतिमा जोशी सांगत होत्या की मध्ये त्या एका सेमिनारसाठी परदेशी गेल्या होत्या. जात नव्हत्या. पण एका दिवसात तयारी करून गेल्या. तिथून त्या रोज मनोहरशी बोलायच्या. याच दरम्यान मनोहरचं दुखणं वाढायला सुरुवात झाली. पण त्याने प्रतिमाला फार काही कळू दिलं नाही. प्रतिमाला तिथे दहा डॉलरचा एंटरटेनमेंट अलौंस मिळत होता. तो इथं तिथं खर्च न करता, तेवढा खर्चून तेवढा वेळ त्या मनोहरशी फोनवरून बोलायच्या. मनोहरशी बोलणं हीच त्यांची एंटरटेनमेंट. दोघंहीजण स्वत:ला भूमिकेच्या एका विशिष्ट पातळीवर किती सहजगत्या जगवत होते.

मनोहरचा हाच प्रामाणिकपणा नि स्वत:ला तात्त्विक भूमिकेवर सहजगत्या जगवण्याची धडपड सर्वांना मोहवून गेली.

चळवळीतल्या कित्येक कार्यकर्त्यांची भूमिका अतिशय मोहक आणि वागणं विपरीत असल्याचं आपण पाहतो. माणूस जेवढा कुशाग्र तेवढा त्याच्या वागण्याला सफाईदारपणे तात्त्विक जोड तो देतो. आपल्याला त्याचंही खरं वाटतं. मुद्दा एवढाच आहे की तात्त्विक पातळीवर जगवताना भल्याभल्यांची परवड होते. मनोहरने ती त्याची होऊ दिली नाही. एकतर अशा भूमिकानिष्ठ कार्यकर्त्यांचा जमाना कमी होऊ लागलाय. सत्तर ऐंशीच्या दरम्यान दलितांपासून आदिवासींपर्यंतच्या ज्या समूहात, आणि असंघटित कामगारांपासून ते भूमिहीनांच्या ज्या समूहात जाऊन काम करणारे कार्यकर्ते होते, त्यांच्या संघटना होत्या, त्याची गती आता खूप कमी झालीय. उजव्या सनातनी शक्तींनीसुद्धा तिथे शिरकाव केलाय. साधनं आणि साधनांच्या नावाने संपत्ती घेऊन काम करणाऱ्यांचा सुकाळ झालाय. अशा वेळी स्वत:ला नैराश्याने ग्रासून न घेता अखंड अविरत काम करणाऱ्या मनोहर अन् त्याच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या फळीला सलाम करण्यासाठी हात वर जातो. एवढ्या निष्ठेने काम करताना मनोहर कधीच तिरसट झाला नाही. आपण ते शहाजोग अन् दुसरे ते चोरचिलटे असा कधीच वागला नाही. दुसऱ्यांविषयी तिरस्काराची भावना त्यात कधीच दिसली नाही. उलट त्याच्यात एक गोडवा होता, एक संयम होता. त्याच्यापेक्षाही त्याचे डोळे खूप बोलके अन् हसरे होते. तो इतरांना समजून घेऊन वागत होता.

माझ्या दृष्टीने आणखी महत्त्वाचं म्हणजे त्याला रिपब्लिकन कार्यकर्त्यां-विषयी किंवा आंबेडकरी कार्यकर्त्यांविषयी अढी नव्हती. अनेकांचे आमच्याविषयी गैरसमज आहेत. आमच्या निष्ठेविषयी, आमच्या कामाविषयी गैरसमज आहेत. आम्ही म्हणजे सर्व दोषसंपन्नतेचे पुतळे! कुणाकडे पाहून मतं बनतात माहीत नाही. त्याची खंत तरी काय बाळगावी! पण मनोहरच्या मनात हे किल्मिष अजिबात नव्हतं. मधू मोहिते त्याचा अनुभव सांगत होता. मधू पूर्णपणे समाजवादी मुशीत तयार झाला. नंतर तो रिपब्लिकन पक्षात आला. त्याच्यासारख्या युवक क्रांती दलातल्या समाजवादी कार्यकर्त्याने रिपब्लिकन पक्षाच्या गदारोळात यावं ही गोष्ट अनेकांना आवडली नाही, असं मधू सांगत होता. पण मनोहरने या गोष्टीचं कौतुक केलं. त्याने मधूला प्रोत्साहन दिलं. आंबेडकरी चळवळीकडे मनोहर निकोप भूमिकेतून पाहत होता म्हणूनच त्याला आंबेडकरी चळवळीतले कार्यकर्तेही प्रेम देत होते. त्याच्या मृत्यूनंतर 'आमचा मार्गदर्शक गेला' अशी प्रतिक्रिया कार्य-कर्त्यांनी व्यक्त केली.

मनोहर कदम हा कोकणातल्या एका गावातून मुंबईला आलेला. हजारो तरुण येतात तसा. त्याने कोकणातली पिळवणूक पाहिली होती. शोषण पाहिलं होतं. शोषणाची जाणीव सर्वांनाच होते असं नाही. ती मनोहरला झाली. त्यातून शोषण व्यवस्थेविरुद्ध लढाईची भूमिका तयार होते. त्याच्यावर ज्या विचारधारेचे संस्कार झाले त्यात तो वाढला. त्याने त्याचा मार्ग स्वत:च निवडला.


अशा पद्धतीने घडलेल्या अनेक कार्यकर्त्यांचा सक्रीय राजकारणावरचा विश्वास उडालेला आहे. त्यात त्यांचा दोषही नाही नि चूकही नाही. मध्ये बिगर संसदीय राजकारणाची खूप चर्चा झाली. अशा, सर्जनशील मनाच्या कार्यकर्त्यांना त्यांच्या विचारधारेतले पक्षही समाधान देत नाहीत. त्यामुळे राजकारणाव्यतिरिक्त रचनात्मक कार्यक्रमाचा ध्यास त्यांना लागतो. महाराष्ट्रातील मनोहर कदम किंवा आसपासच्या पिढीतल्या कार्यकर्त्यांचं राजकारणातून मन का उडालं हा वेगळ्या चर्चेचा विषय आहे. डॉ. लोहिया, जयप्रकाश नारायण, बॅ. नाथ पै यांच्या-सारखे विचार आणि व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव; एसेम जोशी, ना.ग. गोरेंपासून मृणाल गोरेंपर्यंतच्या समाजवादी विचारांचं मार्गदर्शन या वर्गात तयार होऊनही बिगर संसदीय राजकारणाची ओढ का वाढली कळत नाही. पण त्यातून एक झालं. या विचारांच्या पक्षांची तर घसरण झालीच, पण चांगले चांगले कार्यकर्ते राजकारणाच्या बाहेर राहिले. हे बरं की वाईट ही इथे चर्चा नाहीये. मुद्दा फक्त असा आहे की पुष्कळशा मातबर कार्यकर्त्यांनी बिगर राजकारणाची कास धरली. मनोहर कदमसुद्धा बिगर संसदीय राजकारणातला कार्यकर्ता म्हणून वावरला. त्याचं महत्त्वाचं कारण एकच होतं की कुठलेही राजकीय पक्ष अशा कार्यकर्त्यांचं समाधान करु शकत नाहीत. तद्वतच सक्रीय व्हावं एवढं समाधान कुठल्याही राजकीय पक्षाकडून मनोहरचं झालं नसावं.

राजकीय पक्षाचं बाजूला ठेवलं तरीही मनोहरने अंगिकारलेलं काम खूप मोठं होतं यात शंका नाही. तो विचारांच्या बाबतीत सत्यशोधकी वृत्तीचा होता नि ज्योतिबा फुल्यांच्या सत्यशोधक विचारांची परंपरा त्याने कायम राखली हे आदरपूर्वक नमूद करता येईल. मनोहरच्या रुपाने एक प्रामाणिक आणि सच्चा कार्यकर्ता, विचारदेही सहयोगी हरपला ही भावना कायम राहील. चळवळीतल्या कार्य-कर्त्यांनी बोलावलेल्या सभा बैठकींना, छोटेखानी कार्यक्रमांना किंवा एखाद्या प्रसंगाच्या निमित्ताने चर्चा करताना आता, त्या ठिकाणी मनोहर असणार नाही हे बाकी खरं.

मनोहर कदमला भावपूर्ण श्रद्धांजली!

❑❑

*'आपलं महानगर'मधून साभार*



# मेघवनातील मेघदूत

# "आसवले मामा"

■ उल्हास राणे

भीमाशंकर! बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र तीर्थक्षेत्र. सह्याद्रीच्या मावळ परिसरातील डोंगरमाथ्यावरील सदाहरित परिसर आणि तिथल्या महादेव कोळी आदिवासींनी जपलेली देवराई. पुण्या-मुंबईसारख्या महानगरांच्या दुष्परिणामांच्या क्षेत्रात असूनही पर्यावरणदृष्ट्या 'निर्मळ' परिसर. वनस्पती, वन्यजीव आणि निर्मळ मनाची माणसं! देशभरातल्या भाविकांना आणि विशेषत: पुण्या-मुंबईच्या निसर्गप्रेमींना, गिर्यारोहकांना आकर्षित करणारे हे क्षेत्र म्हणजे भीमा नदीचं उगमस्थान. नैऋत्येकडून येणाऱ्या मोसमी वाऱ्यांना थोपवणाऱ्या या सह्यकड्यावर निसर्ग पावसाचे पाच महिने ढगांची शाल पांघरतो. भीमाशंकरचं जंगल 'मेघवन' बनतं!

ही कहाणी आहे या मेघवनातील मेघदूताची! आसवले मामांची! श्री. चिंधू धोंडू आसवले महादेव कोळी आदिवासी जमातीत जन्मले. भीमाशंकर परिसरातील गोठ्याची वाडी इथे लहानाचे मोठे झाले. परंपरागत व्यवसाय शेती. कुटुंबाचं पोट भरण्यापुरता. या डोंगराळ परिसरातील शेतकरी हा खरा कष्टकरी. पावसाळ्याचे पाच महिने भिजत, कुडकुडत, गुरांना सांभाळत भात-नागलीची शेती करायची. लहरी निसर्गाच्या कृपेने मिळालेल्या, वन्यजीवांचा वाटा देऊन उरलेल्या पिकावर वर्षभर गुजराण करायची. त्याला जोड वन्य उत्पादनांची—हिरडा, शिकेकाई इत्यादींची. अधूनमधून रानडुक्करांची शिकार, तोंडी लावायला खेकडे, मासे. किंवा पीक-पाण्याने दगा दिला तर पुन्हा निसर्गाकडेच वळायचे. पावसाळ्यात प्रमुख आहार पावसाळी वनस्पती. आणि त्याही नाही मिळाल्या तर दुष्काळात हात देणाऱ्या, तहान-भूक मारणाऱ्या वनस्पती आहेतच!

घाटमाथ्यावरची आणि पदरावरची पावसाळी शेती करत, गुरांना सांभाळत, भीमाशंकर परिसरातील जंगलातून भटकत, वनातल्या चकव्यातून बाहेर पडत, दुर्गम वाड्यांमधल्या नातेवाईकांना भेटत, सुगीच्या दिवसांत कुस्त्या खेळत खडतर संसार करणाऱ्या आसवले मामांना निसर्ग भावत होता, उमजत होता, संवेदनाक्षम करत होता. त्यामुळेच काम करणाऱ्या अधिक हातांची गरज असतानाही मामांनी आपल्या मोठ्या मुलाला—किसनला—कर्जत तालुक्यातील कशेळी येथील 'ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्सेस'च्या औषधी वनस्पती अभ्यासाच्या प्रकल्पावर काम करायला पाठवलं. त्याला वनस्पती ओळखायला, जमवायला मदत केली. पुढे कुसुम कर्णिक व आनंद कपूर या दांपत्याच्या भीमाशंकर प्रकल्पात काम करायला उत्तेजन दिलं. दुसऱ्या मुलाला—काळूला—शिकायला उत्तेजन दिलं, शिक्षक केलं. नवरा-बायको दोघांनीही संसारगाडा खडबडीत मार्गावरून धडपडत हाकला आणि हा संसार शेतीतून सांभाळायला प्रसंगी स्वत:ला नांगराला जुंपलं!


१९६५-१९७० या कॉलेज जीवनातील गिर्यारोहण-गिरीभ्रमण छंदातून माझी 'भीमाशंकर'शी ओळख झाली. पुढील २५-३० वर्षांत ती अधिक दृढ झाली. तिथल्या गावकऱ्यांनी गिरीभ्रमणाच्या वेळी निवारा दिला. भुकेला दूध-भात-भाकरी व तहानेला ताक दिलं, होळीच्या नाचात, भजनात सामावून घेतलं. पुरणपोळीचं पक्वान्नही दिलं. कुस्तीच्या फडात, यात्रेत सहभागी करून घेतलं. १९७०-१९८० या कालावधीत शहरांमध्ये गिर्यारोहण, गिरीभ्रमण, निसर्ग निरीक्षण या छंदांना गती आली. पुण्या-मुंबईचे निसर्गप्रेमी सह्याद्री परिसरात भटकंतीला जाऊ लागले. निसर्ग संवर्धन-पर्यावरण चळवळही उभारा घेऊ लागली. 'भीमाशंकर' हे या सर्व चळवळींचे केंद्र बनू लागले.

आसावले मामांच्या जीवनाला या कालावधीने एक वेगळे वळण दिलं. आसवले मामा हे 'स्वयंभू' विद्यार्थी! गिर्यारोहकांना, पर्यटकांच्या भटकंतीला मार्गदर्शन करताना मामा 'बाहेरच्या' जगाची मतं ऐकायला लागले. पर्यटक निवासात, मंदिर परिसरात मोलमजुरी करताना सुशिक्षित पुजाऱ्यांकडून, शहरी विद्वानांकडून 'पर्यावरणा'ची माहिती घ्यायला लागले. याच सुमारास भीमाशंकर परिसराला अभयारण्य म्हणून संरक्षण दिलं गेलं. वनखात्याकडे मोलमजुरी करताना मामा वनाधिकाऱ्यांकडून 'वनसंवर्धना'चे धडे घ्यायला लागले. मुंबई-पुण्याचे निसर्गसंशोधक भीमाशंकर परिसरात निसर्ग-अभ्यासाला यायला लागले. त्यांना मदत करताना मामा आपल्याला भावलेल्या निसर्गाचं पृथक्करण करायला लागले. वनाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना दिलेल्या अरेरावी हुकुमांमुळे गावकऱ्यांनी अभयारण्यविरोधी आंदोलन उभं केलं. इतकी वर्षं भावलेला निसर्ग आपल्या जीवनाला जबर चटका द्यायला कारणीभूत होऊ शकतो, हेही मामांनी अनुभवलं. आसवले मामांच्या जीवनात उत्क्रांतीची चक्रं फिरू लागली!

गोठ्याच्या वाडीत जन्मलेल्या आसवले मामांची कर्मभूमी घाटमाथ्यावरील म्हातारबाची वाडी, निगडाळे, भीमाशंकर, पदर ते कोकणातल्या खांडसपर्यंत असली, तरी संपर्कभूमी मात्र जवळ जवळ संपूर्ण आंबेगाव तालुका व काही प्रमाणात राजगुरुनगर (खेड) तालुकाही आहे. त्यात मामा पडले वारकरी. म्हणजे पुणे जिल्ह्यातला वारकरी संप्रदाय हे कुटुंबच. आसवले मामांचे सर्वसाधारण विचारही इतर गावकऱ्यांच्या तुलनेत क्रांतिकारी, तरीही गावकऱ्यांचे हात धरून, त्यांच्याच तालात डोलणारे, नाचणारे! कदाचित ही देणगी मामांना



'पर्यावरण-सरंक्षण-संवर्धन' या क्षेत्रातील कार्याबद्दल व्यक्तीसाठी असलेला
दिवंगत पत्रकार वरुणराज भिडे यांच्या स्मृत्यर्थ
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार
**श्री. चिं. धो. आसवले**



वाडवडिलांकडून मिळाली असावी. कारण मामांचे थोरले भाऊही अतिक्रांतिकारी — काहीसे सर्वांशी फटकून वागणारे. आसवले मामा मात्र पंचक्रोशीत कुणाशीही गळ्यात गळा घालून गप्पा मारतील, सुख-दु:खाच्या गोष्टी करतील, घरांना दिलासा देतील. पांढरं धोतर, सदरा, गांधी टोपी, गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गंध, चेहऱ्यावर मृदू हास्य अशा आसवले मामांना सर्व घरात प्रेमाच्या नात्यामुळे आदराचं स्थान.

आसवले मामांच्या या सहिष्णू स्वभावाचा व प्रेमळ जनसंपर्काचा उपयोग मामांकडून कळत-नकळत घडलेल्या पर्यावरण संवर्धन कार्याला झाला. मामा घराघरापर्यंत पोहोचू शकले. बाहेरील निसर्ग-अभ्यासकांना, पर्यावरण कार्यकर्त्यांना, समाजसेवकांना, वनाधिकाऱ्यानांही ते या गावकऱ्यांपर्यंत पोहोचवू शकले. आसवले मामा भीमाशंकर परिसरात पर्यावरण संवर्धन संदेश देणारे दूत झाले. पण आसवले मामा नुसते दूत नव्हते. त्यांनी आपल्या निसर्गज्ञानाची आणि गावकऱ्यांच्या अडचणींची, खडतर जीवनाची माहिती या बाहेरील अभ्यासकांना दिली. दुर्गम, डोंगराळ परिसरातील आदिवासींच्या हालअपेष्टांचे स्वानुभव, निसर्गाची गूढ भाषा आणि पर्यावरणशास्त्र यांची सांगड घालून आसवले मामांनी पर्यावरण आणि वनसंवर्धन कायद्यांसाठी आपली स्वतंत्र, यथार्थ नीती बनवली. ही नीती गावकऱ्यांना, वनाधिकाऱ्यांना, संशोधकांना, समाजसेवकांना १०० टक्के पटत नव्हती, पण सोडवतही नव्हती. आसवले मामा वारकरी प्रवृत्तीने, आपल्या पद्धतीने पर्यावरण जागृतीचे, संतुलित विकासाच्या संदेशाचे काम करत राहिले. दुसऱ्या बाजूला सरकार, वनाधिकारी यांच्याशी प्रसंगी असहकार, झगडणेही चालू ठेवले. निसर्ग-अभ्यासकांना, संशोधकांना मदतही चालू राहिलीच.

गावकऱ्यांचा रोष पत्करून मामांनी भीमाशंकर परिसरातील शेवाळं, कारवी यांच्या व्यापारी विक्रीला आळा घातला. मंचर, राजगुरुनगर परिसरातील कंत्राटदारांकडून भीमाशंकर परिसरात होणारी चोरटी जंगलतोड प्रसंगी जीव धोक्यात घालून व वनाधिकाऱ्यांचा पाठपुरावा करून थांबवली. गावकऱ्यांच्या घरगुती सरपणाला अडवणाऱ्या वनाधिकाऱ्यांना प्रथम पर्यटक निवासातला सरपणाचा वापर बंद करायला लावला. गावाला घासलेटचा पुरवठा करायला भाग पाडलं. वनसंवर्धनाचे महत्त्व गावकऱ्यांना विविध मार्गांनी पटवून देतानाच, त्यांच्या पिढीजात अधिकारांसाठी वनखात्याशी झगडणं चालू ठेवलं. 'वन्यजीवांची शिकार चूक आहे', हे गावकऱ्यांना सांगतानाच 'शेतीचा नाश करणाऱ्या रानडुक्करांना मारायला परवानगी द्या किंवा योग्य नुकसानभरपाई द्या', असा सडेतोड जबाब सरकारी अधिकाऱ्यांना दिला. भोरगिरीच्या गुराख्यावर बिबळ्याने केलेल्या हल्ल्यानंतर औषधोपचार




व आर्थिक मदतीसाठी त्यांनी वनाधिकाऱ्यांशी जीवापाड झगडा केला. आसवले मामांच्या निसर्गज्ञानाचा, जंगल माहितीचा उपयोग व्हावा म्हणून वनखात्याने त्यांना नोकरी दिली. पण या सरकारी, सुरक्षित नोकरीत राहूनही गावकऱ्यांच्या बाजूने वनाधिकाऱ्यांशी सतत झगडणाऱ्या, भ्रष्टाचाराला विरोध करणाऱ्या मामांना शेवटी वनखात्याने नोकरीतून काढून टाकलं. एक प्रकारे मामांची 'सुटका' झाली!

'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी', 'जागतिक वन्यजीवन निधी, 'भारतीय वन्यजीव संस्था' इत्यादी अनेक संस्थांमधील अभ्यासकांना आसवले मामांनी मोलाची मदत व मार्गदर्शन केलं आहे. भीमाशंकर येथेच सापडणाऱ्या शेकरू (इंडियन जायंट स्क्विरल) या झाडांवर राहणाऱ्या देवखारीच्या अभ्यासाच्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पात मामांचा मोठा सहभाग आहे. अनेक विदेशी संशोधकांनाही मामांनी आपल्या निसर्ग-जाणिवांची चुणूक दाखवून चकित केले आहे. भीमाशंकर अभयारण्यातील वन्यप्राणी गणनेत वनखात्याला व स्वयंसेवकांना मामांचे अजोड मार्गदर्शन होत असते. 'सह्याद्री वाचवा' मोहिमेतही मामांचा मोठा सहभाग होता. भीमाशंकर परिसरातील पाणवठ्यांचे संशोधन एका प्रकल्पांतर्गत चालू असताना मामांना भीमाशंकरच्या पौराणिक माहितीची जाणीव झाली. या परिसरात दोनशेच्या वर तीर्थांचा उल्लेख असल्याचे कळले. ही तीर्थं म्हणजे झरेच असणार, म्हणून त्यांची नावं, जागा, दिशा या मार्गाने शोधाशोध करताना सुमारे साठ तीर्थं सापडली. मामांच्या या ज्ञानाचा उपयोग खरं तर वनखात्याला जलसंवर्धनासाठी करता आला असता! भीमाशंकर परिसरातील जंगल विभागांना पुरातन, सुंदर नावं आहेत. हिंदोळा, गौराई, चौरा, भट्टीचा माळ इत्यादी. डोंगर, दऱ्या, झरे यांनाही नावं आहेत, प्रत्येक परिसरात वनदेव-देवराया आहेत. मामांकडून याविषयी कहाण्या, अनुभव ऐकताना अवघं वनचित्र डोळ्यांसमोर उभं राहतं!

आसवले मामांच्या जनसंपर्काचा खरा उपयोग झाला, 'माणूस-वन्यजीव संघर्ष' या संशोधन प्रकल्पाला. अभयारण्य परिसरातील गावांचं सामाजिक सर्वेक्षण मामांनी कोणाही समाजशास्त्रज्ञावर मात करेल, अशा कार्यक्षमतेनं केलं. दहा गावांतील प्रत्येक माणसाशी बोलून आणि त्यांना बोलतं करून मामांनी सामाजिक माहितीचा अजोड खजिना उभा केला. त्याशिवाय या सर्वेक्षण संधीचा उपयोग त्यांनी लोकजागृतीसाठी केला. एकत्रित वनविकासाचा एक स्वतंत्र विचार त्यांनी आपल्या मनात तयार केला. निसर्गशिक्षणाची संधी मिळताच गाव-प्रतिनिधींना घेऊन इतर अभयारण्यांची व तिथल्या लोकांच्या अडचणींची पाहणी केली, शास्त्रशुद्ध माहिती जमविली. लोकांच्या मुलाखती घेतल्या आणि भीमाशंकर परिसरासाठी वननीती तयार केली. गावकरी आणि वनखातं यांमधील सुसंवादासाठीही मामांचे प्रयत्न सतत चालू असतात. कुंभरी शेतीपद्धत पर्यावरणाला घातक आहे, हे मामांना पटले. मग वनखातं, निसर्गप्रेमी यांना जोडीला घेऊन ते गावकऱ्यांना पटवायचा अथक प्रयत्न मामांकडून चालू आहे. आसवले मामांची परिस्थिती विचित्र आहे. वनखातं त्यांना गावकऱ्यांच्या बाजूचं समजतं, तर गावकरी त्यांना जंगलांच्या बाजूचं समजतात! एक मात्र सत्य आहे. कोणीही त्यांना निसर्गविरोधी किंवा लोकविरोधी समजत नाही.

संतुलित ग्रामविकास योजना व एकत्रित वनविकास या योजना मामांना फार भावल्या आहेत. विविध सरकारी अधिकाऱ्यांकडून, समाजसेवी संस्थांकडून मामांनी माहिती जमवून 'श्रमशक्तीद्वारे ग्रामविकास' योजना कमीतकमी एका गावात राबवायचा निश्चय केला. राळेगण शिंदीसारख्या गावांची माहिती मिळवली. जलसंवर्धन, मृद्संधारण व वनसंवर्धन या तीन कलमी कार्यक्रमांवर जोर द्यायचं ठरवलं. स्थानिक आदिवासींचं शिक्षण, नोकरी, रोजगार यांसाठी विविध योजना त्यांच्या नजरेसमोर आहेत. त्यासाठी प्रयत्न



चालू आहेत. भीमाशंकर परिसरातील दुर्मीळ व औषधी वनस्पतींची रोपवाटिका करण्याचं काम त्यांनी स्वत:च सुरू केलं आहे. या गरीब, खडतर जीवन जगणाऱ्या आदिवासी वारकऱ्याने आपली स्वत:ची जमीनही अशा प्रकल्पांसाठी देऊ केली. लोकाभिमुख प्रकल्पांना यश यायला वेळ लागतो. काही महिन्यांपूर्वीच मामांच्या अथक प्रयत्नांना यश येऊन संपूर्ण 'म्हातारबाची वाडी' गाव संतुलित विकासासाठी एकत्रित झालं आहे. त्याबरोबरच इतर गावांमध्येही ग्रामसमित्या तयार होत आहेत. मामांच्या सुमारे वीस वर्षांच्या प्रयत्नांचीच ही पावती आहे. मामा हे काम जाणूनबुजून करताहेत, असं वाटत नाही. बहुधा त्यांना त्यांच्या कार्याची जाणीवही नसावी. ते त्यांच्या जीवनाचंच अंग झालं आहे. त्यामुळेच त्यांना मिळालेला 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चा पुरस्कार हा खरं तर भीमाशंकरच्या आदिवासींचा पुरस्कार आहे, अशी मामांची धारणा आहे.

आसवले मामांचे वैयक्तिक जीवनही अनेक खाचखळग्यांतून जात राहिले. आर्थिक अडचण तर नेहमीचीच. पत्नीचं, सुनेचं आजारपण, मुलांच्या नोकऱ्या-व्यवसाय, त्यांचे संसार यांसारख्या काळज्यांतून जाताना मध्यंतरी त्यांनी मुंबईत मोलमजुरी करण्याचा प्रयत्न केला. भीमाशंकरच्या जंगलात कुठूनही वाट काढणारे मामा मुंबईत स्वत:ला हरवून बसले. ते सहन न झाल्याने दोन-तीन महिन्यांत भीमाशंकरला परतले! त्यातच सात-आठ वर्षांपूर्वी मामांना जबड्याचा कर्करोग असल्याचं कळलं. मुंबईतील टाटा रुग्णालयातील तपासणीअंती हा पराकोटीचा कर्करोग असून पुढील जीवनाची शाश्वती नाही, असं कळलं. मामा खऱ्या वारकऱ्याप्रमाणे स्थितप्रज्ञ राहिले. डॉक्टरांनी अखेरचा प्रयत्न म्हणून शस्त्रक्रिया करून जबडा काढून टाकला. आयुष्याची हमी — दोन दिवस ते दोन वर्षं! पण मामांनी त्यावर मात केली! शस्त्रक्रियेनंतरची सात-आठ वर्षं मामा पूर्वीप्रमाणेच कार्यरत आहेत. मन अधिक संवेदनाक्षम झालं आहे. टाटा रुग्णालयातल्या शस्त्रक्रियेच्या वेळची आठवण येते. मामांना रक्त हवं होतं. केवळ दूरध्वनी संपर्कातून अल्पावधीत मुंबईतील अनेक निसर्गप्रेमी रक्तदानाला उभे राहिले. भीमाशंकरपासून दूर असूनही मामा एकटे नव्हते. आसवले मामांच्या निसर्गप्रेमाचं, माणुसकीचं नातं आता रक्तानं जोडलं गेलं! भीमाशंकरचा 'मेघदूत' पर्यावरण संवर्धनासाठी पुन्हा कार्यरत झाला!

❑❑



# IS LIFE BEAUTIFUL IN THE BHIMASHANKAR CLOUD FOREST?

■ DR. RENEE M. BORGES

Scientists often, mistakenly, feel that they can conquer the world, and that people should sit up and listen to them. This attitude is accompanied by arrogance and often a terrible disdain for the layman. What could a layman possibly know about the working of the world?

With this attitude I would never have learnt to look at the forest through the eyes of a forest dweller. I would have remained deaf, blind and uninformed about the "hidden" forest.

Chindoo Asawale (affectionately called Asawale *mama*) and I met in 1995 when I came to Bhimashankar to study the Indian giant squirrel for my Ph.D. I was looking for a field assistant and thus Asawale came into my life. I needed someone who knew this cloud forest, who could help me locate the best patches and populations of squirrels to study, someone whom the other local people trusted, and someone whom I could trust with my life. Asawale was all this and much more.

In 1985, Asawale was not a village elder although already a grandfather and the father of two grown up sons. But he was much respected and would bring some of the village elders to the forest to help me with my work. While marking trails and tagging trees, I would get quizzed by the elders with nature riddles from their lore : I often failed the tests and would be the subject of much laughter and ridicule. The city girl knows nothing; she has much to learn. And so I came to realise that what they said was true.

Asawale and the rest of the Bhimashankar inhabitants taught me to recognise forest signs; to know when a hive laden with honey was in a treehole, to know which mushrooms were edible, how to harvest crabs from streams; which plants were medicinal and which were famine foods; how to trap wild boar and where to look for hyena

We learned together about giant squirrels and delighted in our shared knowledge. Asawale became my spokesman and public relations person who then would tell visitors to Bhimashankar what the city girl was actually up to! He protected me from miscreants, fed me with the most fragrant *ambe-mohar* rice drenched in milk and sugar, and kept me company on those very very long evenings. We would write the alphabet together and talk philosophy, about life, loneliness, death and destiny.


We worked in the forest from daybreak to past dusk, and it was for me a revelation. The evenings at the field station were long and lonely but here in the forest, it was all happening around me, and there was so much to see. And for a whole year Asawale shared this all, every moment. Of course, Ganpat, Soma and Kisan, and many others did too, but this was something special.


Asawale came with us to Mumbai, to experience our world and to earn more money; but the roads were too big and uncrossable, the local trains went in the wrong direction all the time, and he was lost. Ganpat came too, and he too was lost in this strange, big world. Ganpat left first, back to their "normal" world; Asawale soon followed; unwilling to trade money for familiarity.

A few years later, we came back to Bhimashankar, to document tribal economies, to study wildlife-human conflicts, to estimate crop damage by wild boar, to build bridges between the administration and the local people. Here again, Asawale was the people's spokesman; and we learnt much about hardship and life below the poverty line, about vulnerability to circumstances, about despair, and strangely enough about courage and hope.

Here is not the time and place for me to debate the issue of the "sustainability" of the lifestyle of local people who dwell in the hamlets of Bhimashankar. What I will say is that life here is hard, harder than can be imagined and if people like Asawale who lead such a hard life can be generous and caring, can welcome ignorant scientists to their world and share it with them, then life here is beautiful, as are the people of this unforgiving cloud forest.

❑❑





# संवेदनशील
# संजय संगवई

■ मिलिंद मुरुगकर

'द रिव्हर अँड लाईफ' हे नर्मदा आंदोलनावरील संजयने लिहिलेले पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. या पुस्तकाच्या दुसऱ्या पानावर पुस्तकाची अर्पणपत्रिका आहे. अर्पणपत्रिकेतील नावे वाचून नर्मदा आंदोलनाशी ज्यांचा जवळून परिचय आहे, अशांचे डोळे पाणावले नाहीत असे घडणार नाही. नर्मदा आंदोलनाच्या गेल्या दहा-बारा वर्षांच्या काळात आंदोलनात योगदान केलेल्या परंतु आज हयात नसलेल्या कार्यकर्त्यांच्या स्मृतींना संजयने हे पुस्तक अर्पण केले आहे.

इतिहास सहसा ज्यांच्या कामाची नोंद घेत नाही अशा सामान्य माणसांमधील मोठेपणा जगासमोर मांडणे, त्यांच्याविषयी अपरंपार कृतज्ञता बाळगणे हा संजयच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विलोभनीय पैलू आहे.


महाराष्ट्रातील राजकीय-सामाजिक चळवळींशी संबंधित असलेल्या बहुतेकांना संजय संगवई हे नाव ओळखीचे आहे.

जवळ जवळ दोन दशकाहूनही अधिक काळापासून संजय विविध वृत्तपत्रे, मासिकातून लिहीत आला आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी संजय नर्मदा बचाव आंदोलनात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून सामील झाला. तेव्हापासून त्याचा रस नर्मदा आंदोलनाची भूमिका, विकासविषयक मुद्दे यात जास्त राहिला. पण त्यापूर्वीच्या काळात संजयच्या लेखणीने राजकीय-सामाजिक घडामोडींपासून शास्त्रीय संगीतापर्यंत अनेकविध विषयांना स्पर्श केलेला आढळतो. तरूण वयात संजयला लाभलेले अनुभव, श्री. ग. माजगावकर, राम बापट, मेधा पाटकर आदी अनेक व्यासंगी व्यक्तींचा सहवास व या सर्वांची बारकाईने नोंद घेणारे संवेदनशील मन पहाता संजयच्या या मोठ्या आवाक्याचे आश्चर्य वाटणार नाही.

सर्वसाधारणपणे एखाद्या विशिष्ट चळवळीत स्वत:ला झोकून दिलेल्या व्यक्तींच्या स्वभावात एक प्रकारचा एकारलेपणा येतो. पण संजयच्या बाबतीत तसे घडले नाही. याचे कारण कदाचित त्याला लाभलेल्या समृद्ध सांस्कृतिक वारशात असेल. संजयचे बालपण व विद्यालयीन आयुष्य मराठवाड्यात गेले. त्याचे आजोबा हैद्राबाद मुक्ती आंदोलनात आघाडीवर होते. मामा समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते. त्यावेळचे मराठवाड्यातील वातावरणही सामाजिक चळवळींनी भारलेले. नरहर कुरुंदकरांची लेखणी, विचार महाराष्ट्रातील वैचारिक चर्चाविश्वावर आपला ठसा उमटवीत होती. दलित चळवळ, मराठवाडा विद्यापीठाचा नामांतराचा प्रश्न यामुळे मराठवाडा ढवळून निघाला होता. या सर्वांचा प्रभाव संजयच्या संवेदनाक्षम मनावर पडला नसता तरच नवल.

श्री. ग. माजगावकरांच्या 'माणूस'ने तेव्हा महाराष्ट्रातील जनमानसात मानाचे स्थान मिळविले होते तेव्हा संजय स्वाभाविकपणेच 'माणूस' परिवारातील एक सदस्य बनला. त्या काळात 'माणूस' हिंदुत्ववादी, समाजवादी, कम्युनिस्ट अशा सर्वांना आपला वाटायचा. विविध विचारसरणीच्या






वैशिष्ट्यपूर्ण कार्य केल्याबद्दल व्यक्तीसाठी असलेला
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार
**श्री. संजय संगवई**

लेखक विचारवंतांचा 'माणूस' हा गप्पांचा अड्डा होता. कदाचित यामुळे संजय कोणालाही 'हिंदुत्ववादी', 'समाजवादी' अशी लेबले चिकटवून मोकळा होत नाही. या विचारसरणींमधील सूक्ष्म वैविध्यांची त्याला चांगली जाण आहे.

संजयला आधुनिक अशा वैचारिक प्रवाहांचेच भान आहे असे नाही. तर त्याच्यावर खास भारतीय परंपरांचाही संस्कार झालेला आहे. गो. नी. दांडेकरांबरोबर महाराष्ट्रातील गड पहाण्यासाठी भ्रमंती केलेल्या संजयला अभिजात संस्कृत वाङ्मयाचीही जाण आहे. पारंपारिक भारतीय दर्शनांची माहिती आहे. शास्त्रीय संगीताची खोलवर जाण आहे.

माणूसमधील त्याचे अनेक लेख वैशिष्ट्यपूर्ण आहेत ते केवळ त्यांच्या आशयामुळे नाही तर संजयच्या खास शैलीमुळे देखील. माणूसमध्ये संजयने विपुल लेखन केले. त्यात ओरिसातील कलहांडी, स्वयंसेवी संस्था व शेतकरी संघटनेवरील लेख विशेष गाजले. ऐंशीचे दशक शेतकरी आंदोलनाने गजबजलेले दशक होते. 'माणूस'ने या आंदोलनाची दखल तत्परतेने व गांभीर्याने घेतली. या आंदोलनावर विशेषांक काढले. शेतकरी संघटनेवरील लेखासाठी संजय महाराष्ट्रभर फिरला. विविध कार्यकर्त्यांशी भेटी घेऊन त्याने त्यावर लिहिले. शेतकरी संघटनेमधील अनेकांना तो लेख अतिशय आवडला. या भ्रमंतीमुळे शेतकरी आंदोलनाशी जुळलेला संजयचा संबंध त्याच्या वैचारिक जडणघडणीवर मोठा परिणाम करणारा ठरला.

सर्वसाधारणपणे शेतकरी वर्गाकडे पाहण्याचा डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांचा एक सरधोपट दृष्टिकोण असतो. शेतकरी व शेतमजूर यांच्यातील शोषक-शोषित संबंध हाच त्यांच्या आकलनाच्या केंद्रस्थानी असतो. परंतु आजची अर्थव्यवस्था संपूर्ण शेतीव्यवसायाचे शोषण करणारी आहे, याचे भान शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने पहिल्यांदा आणले. संजयच्या डाव्या विचारसरणीवर शेतकरी संघटनेच्या या विचाराचा मोठाच प्रभाव पडला. त्यामुळे त्याची दृष्टी व्यापक बनली.




अशा अनेक विचारसरणींनी, संस्कारांनी बनलेला संजयचा व्यापक दृष्टिकोण नर्मदा बचाव आंदोलनासाठी फार मोलाचा ठरला. नर्मदा बचाव आंदोलनासाठी पूर्णवेळ काम करण्याचा निर्णय संजयने दहा वर्षापूर्वी घेतला. त्यावेळेस तो पुण्यातील सकाळमध्ये उपसंपादक होता. संजयच्या वृत्तपत्रसृष्टीतील प्रदीर्घ कामाचा अनुभव नर्मदा आंदोलनासाठी उपयुक्त ठरला. नर्मदा आंदोलनाचे एक वैशिष्ट्य असे की या आंदोलनाने प्रसिद्धी माध्यमांचा मोठ्या कुशलतेने वापर केला आणि यात संजय संगवईचा मोठा वाटा आहे. गेल्या दहा वर्षात विविध वृत्तपत्रांतून, मासिकांतून संजयने नर्मदेच्या प्रश्नावर किती लेख लिहिले असतील? या प्रश्नाचे उत्तर 'अगणित' असेच द्यावे लागेल. महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ अशा मोठ्या वृत्तपत्रांबरोबरच लोकमत, गावकरी, देशदूत अशा स्थानिक वृत्तपत्रांतूनदेखील संजयने नियमित व विपुल लेखन केले. केवळ लेखनच नव्हे तर नर्मदा आंदोलनाच्या बातम्या सातत्याने वृत्तपत्रात आणण्यात संजय कमालीचा यशस्वी ठरला. आज नर्मदा आंदोलनाला जागितक पातळीवरदेखील मोठी प्रसिद्धी मिळालेली आहे. त्यामुळे आज या आंदोलनाच्या बातम्या वृत्तपत्रात येणे ही काही मोठी गोष्ट नाही. परंतु संजय या विषयावर 'नर्मदा बचाओ आंदोलन' हे नाव येण्याअगोदरच्या म्हणजे नर्मदा धरणग्रस्त समितीच्या काळापासून लिहीत आला आहे. संजय संगवई हे नर्मदा बचाओ आंदोलनाचे चालते-बोलते ऑफिसच ठरले. आंदोलनाची पत्रके, पुस्तिका यांनी जड झालेली हॅवरसॅक पाठीवर घेऊन मणीबेली, अक्कल-कुव्यामधील डोंगरदऱ्या, मध्यप्रदेशातील निमाडमधील नर्मदेच्या खोऱ्यापासून दिल्लीपर्यंत




सर्वत्र संजयने भटकंती केली. संजय पुण्यात असो की नाशिकमध्ये किंवा धुळ्यात. तो कोठेही असला तरी त्याची त्या भागातील वृत्तपत्रांच्या कार्यालयातील फेरी ठरलेलीच. महाराष्ट्रातील जिल्हा पातळीवरील बहुतेक सर्व वृत्तपत्रातील पत्रकारांशी संजयने व्यक्तिगत संबंध ठेवलेले आहेत. नर्मदा आंदोलनाच्या भूमिकेशी तीव्र मतभेद असलेल्या पत्रकारांकडूनदेखील संजयला मोठे सहकार्य मिळाले याचे कारण त्याच्या चिकाटीमध्ये व निरलसपणे स्वत:ला पूर्णपणे ओतून काम करण्याच्या वृत्तीमध्ये असेल.

या काळात संजयने जो प्रवास केला त्याला केवळ 'अफाट' असेच म्हणता येईल. फक्त मराठी वृत्तपत्रांतूनच नव्हे तर 'इंडियन एक्सप्रेस', 'टाइम्स ऑफ इंडिया', 'हिंदू फ्रंटलाइन' अशा इंग्रजी वृत्तपत्रांत व मासिकांमधून देखील संजयने लेख लिहिले. वादविवादात नर्मदा आंदोलनाची बाजू जोरकसपणे मांडली.

देशभरात संजयने जी भ्रमंती केली त्यामुळे अनेक स्वयंसेवी संस्था, संघटना नर्मदा आंदोलनाशी जोडल्या गेल्या. आणि तो या विविध विचारसरणीच्या लोकांशी संवाद साधू शकला, याचे कारण त्याला विविध राजकीय विचारप्रणालींचे भान आहे.

नर्मदेच्या प्रश्नावर संजयने इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतून पुस्तिका काढल्या आहेत. त्याचे अलिकडेच प्रसिद्ध झालेले 'रिव्हर अँड लाईफ' हे पुस्तक तर संपूर्ण आंदोलनाचा एक दस्त-ऐवज ठरावे. या प्रश्नाच्या तांत्रिक बाजूचे सर्व आकडे तर या पुस्तकात आहेतच पण आजवरच्या लढ्याचे सर्व बारीक सारीक तपशील या पुस्तकात नोंदवलेले आहेत व महत्त्वाचे म्हणजे या लढ्याचा नायक असलेला नर्मदेच्या खोऱ्यातील शेतकरी-आदिवासी आपल्याला पानोपानी दिसतो.

संजयचा मूळ स्वभाव फिरस्त्याचा आहे. आज प्रकृतीच्या कारणामुळे त्याच्या फिरण्यावर मर्यादा आल्या असल्या तरी तो आंदोलनाच्या कामात तो तितकाच व्यग्र आहे. आंदोलनासंदर्भातील बातम्या वृत्तपत्रांकडे पोहोचवणे, लेख लिहीणे, आंदोलनाच्या समर्थकांपर्यंत माहिती पोहोचवणे हे त्याचे काम सातत्याने चालू असते. इंटरनेटच्या सहाय्याने जगभरच्या पर्यावरणवादी लोकांशी संपर्कात रहाणे, आंदोलनाच्या बातम्या त्यांच्यापर्यंत पोहोचवणे हे काम तो पूर्वीइतक्याच उत्साहाने व परिणामकारकतेने करीत आहे. नर्मदा आंदोलनाशी संबंधित कोणीही आपली इंटरनेटवरील मेल बॉक्स उघडली आहे आणि त्यादिवशी आंदोलनाशी संबंधित अशा इमेल्स संजयकडून आल्या नाहीत असे सहसा घडत नाही.

चळवळ हा संजयच्या स्वभावाचा स्थायिभाव आहे. तोच जगण्याचा हेतू आहे. खरे तर प्रकृतीसारख्या क्षुल्लक कारणामुळे या फिरस्त्यावर मर्यादा येणे हे अशक्यच होते.

□□



5431
891.46
Man/2K

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार

## १९९६

| | | |
|---|---|---|
| समाजप्रबोधन (संस्था) | : | महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | विलास वाघ, पुणे |
| पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) | : | वासुदेवराव चित्रे, पालघर |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | विजया चौक, धुळे |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य | : | रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ |

## १९९७

| | | |
|---|---|---|
| स्त्रियांचे प्रश्न (संस्था) | : | कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे |
| समाजप्रबोधन (संस्था) | : | लोक विज्ञान संघटना, पुणे |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | शुभदा देशमुख, गडचिरोली |
| पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) | : | विजय नारकर, देवरूख |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | लीला पाटील, कोल्हापूर |

## १९९८

| | | |
|---|---|---|
| पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) | : | निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | जयंत गडकरी, मुंबई |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | बापुसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज |
| पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) | : | हुमायून अब्दुलअली, मुंबई |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | सुरेखा दळवी, पेण |

## १९९९

| | | |
|---|---|---|
| प्रबोधन (संस्था) | : | समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | रेहाना बैलिम, अमरावती |
| पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) | : | कुसुम कर्णिक, पुणे |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | भरत कावळे, नाशिक |

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार २००० सल्लागार समिती, मुंबई



मृणाल गोरे - विश्वस्त,
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
अध्यक्ष
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य
गौरव पुरस्कार समिती



**पन्नालाल सुराणा**
पत्रकार आणि समाजवादी
चळवळीतील कार्यकर्ते



**अर्जुन डांगळे**
साहित्यिक व आंबेडकरवादी
चळवळीतील कार्यकर्ते



**पुष्पा भावे**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीच्या अभ्यासक,
सामाजिक कृतज्ञता निधीच्या
विश्वस्त



**उल्हास राणे**
पर्यावरण तज्ज्ञ,
बॉम्बे नॅचरल हिस्टरी
सोसायटीच्या कार्यकारी मंडळाचे
सदस्य



**नागेश हाटकर**
आदिवासी व असंघटित कामगार
चळवळीतील कार्यकर्ते



**सुरेश कराळे**
पत्रकार



**आनंद करंदीकर**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक



**कुमार शिराळकर**
शेतकरी शेतमजूर, आदिवासी
चळवळीतील कार्यकर्ते

# निवड / सल्लागार समिती (अमेरिका)



सुनील देशमुख



**अशोक सबनीस**
वास्तुविशारद, लेखक, न्यूयॉर्क सिटी ट्रांसिट ॲथॉरिटीमध्ये डेप्युटी डिव्हिजनल आर्किटेक्ट, मराठी साहित्यात रस.



**अरुण गांधी**
भारतातील जातिव्यवस्था, अमेरिकेतील वंशवाद आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्ण संघर्ष यांवर सातत्याने कार्य, 'एम. के. गांधी इन्स्टिट्यूट फॉर नॉन व्हायलंस' या संस्थेचे संस्थापक.



**शोभा चित्रे**
वॉशिंग्टन डी. सी.
'गोठलेल्या वाटा' आणि 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या लेखिका. अनेक नियतकालिकांतून, विशेषतः 'मौज'मधून, सातत्याने ललित लेखन, अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात सहभाग.



**डॉ. अरुंधती विनोद**
स्त्रीरोगतज्ज्ञ, टेनाफ्लाय, न्यू जर्सी
अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित.



**सुनीता धुमाळे**
अमेरिकेमध्ये 'दक्षिण आशियाई महिलांचे प्रश्न' हे प्रमुख कार्यक्षेत्र. तेथील मराठी स्त्रियांमध्ये 'आत्मभान' जागविण्याचे कार्य. हॉस्पाईससारख्या संस्थेच्या सल्लागार.



**प्रा. डॉ. जयंत लेले**
क्वीन्स विद्यापीठातील समाजशास्त्राचे अध्यापक, विविध सामाजिक विषयांचे चिंतनशील अभ्यासक व लेखक.

# महाराष्ट्र फाउण्डेशन

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे.

१९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था करीत आहे.


आदिवासीमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे सहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

रुग्णवाहिका, एड्स चिकित्सा प्रयोगशाळा, ग्राम-दत्तक योजना वगैरेंसारख्या कल्याणकारी स्वरूपाच्या योजनांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन' सहाय्य करीत असते. अलीकडच्या काळात 'कॉम्प्युटर सेंटर फॉर सोशल चेंज' या योजनेखाली संगणक शिक्षणाचा प्रसार व्हावा, म्हणून महाराष्ट्रातील विविध शिक्षण संस्थांना संगणकांचे संच भेट देण्याची योजना कार्यान्वित केली आहे. तसेच, नाशिक येथील 'रचना ट्रस्ट'च्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांना फुलांच्या, फळांच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळविण्याची क्षमता वाढावी, असे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याकरिता 'महाराष्ट्र फाउण्डेशन' सहाय्य करते. आदिवासी व मुस्लिम स्त्रियांना उत्पन्नाचे साधन होईल अशा प्रकारचे जे प्रशिक्षण 'महात्मा गांधी लोकसेवा संघा'तर्फे दिले जाते, त्याकरिताही 'महाराष्ट्र फाउण्डेशन' मदत करते.

Invest in Future
of Those
Who Have No Future....
so They Can Reinvest

ही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ची घोषणा आहे.

लोकशिक्षण, जनसंघटन, जनआंदोलन अशा विविध मार्गांनी प्रश्नांची तड लावू पाहणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल समाजाला वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी व अशा समाजकार्याला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'समाजकार्य गौरव पुरस्कार योजना' कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे.



# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. 'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. 'ट्रस्ट'चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिकशास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते; व संशोधन करणारे व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

'ट्रस्ट'मध्ये एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' आहे. या केंद्रात नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबीरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम 'ट्रस्ट'तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन 'ट्रस्ट'तर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नतनगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'ट्रस्ट'ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी, गोरेगाव (प.) या झोपडपट्टी विभागात 'कल्याण केंद्र' सुरू केले आहे.

'ट्रस्ट'च्या दोन्ही वास्तूंमध्ये वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे वाचनालय, असे अनेक उपक्रम 'ट्रस्ट'तर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' संस्थेचे कार्य 'ट्रस्ट'च्या वास्तुतूनच केले जाते.

**विश्वस्त मंडळ**

श्री. र. गो. करमरकर, श्रीमती मृणाल गोरे, श्रीमती कुसुम सामंत, श्री. कृष्णनाथ नेवरेकर,
श्री. मधु आडेलकर, श्री. श्रीनिवास प्रभू, श्री. रमाकांत कदम, श्री. चंद्रकांत केळकर




# सुनील देशमुख

श्री. सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली व पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला. नंतर अमेरिकेतच कमोडिटी ट्रेडर म्हणून वॉल स्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक, विलेपार्ले) आणि गिरीश, निशा व सुशील ही तीन मुले यांच्यासह ते अमेरिकेतच स्थायिक झाले आहेत. व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा याविषयी विशेष आस्था आहे.

वयाच्या ४६व्या वर्षी व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यावर आठवड्यातील काही काळ सामाजिक सेवेच्या कामासाठी ते आवर्जून देत असतात.


891.46
Man/2K

# मंथन

२०००

